महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

उंद्री (ता. चिखली जि. बुलढाणा) या गावाचे उदयनगर असे नामकरण करणेबाबत

(१) ३२२९२ (०६-०९-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उंद्री (ता.चिखली, जि.बुलढाणा) या गावाचे उदयनगर असे नामकरण करण्यात यावे अशी स्थानिक नागरिकांची असलेल्या मागणीचा प्रस्ताव दिनांक २१ मार्च, २०११ रोजी जिल्हाधिकारी यांनी आयुक्त अमरावती यांचे मार्फत प्रधान सचिव महसूल व वन विभाग यांच्याकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव गृह मंत्रालयाच्या पत्र क्रमांक १३०/५३, दिनांक ११ सप्टेंबर १९५३ अन्वये विहित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे नसल्याने सुधारित प्रस्ताव सादर करण्यात आलेला असून त्यामध्ये सुद्धा विसंगती आढळल्याने त्याबाबतचा स्वयंस्पष्ट अभिप्राय देण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० मे, २०२१ रोजी विभागीय आयुक्त, अमरावती यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी उंद्री या गावाचे उदयनगर असे नामकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२०-०९-२०२२) : (१) खरे आहे.

तथापि, विभागीय आयुक्त, अमरावती यांनी प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना दि.२३ एप्रिल, २०१८ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव सादर करतांना संदर्भामध्ये नजरचूकीने दि.२१ मार्च, २०१८ ऐवजी दि.२१ मार्च, २०११ अशी तारीख नमूद करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी, बुलडाणा यांनी विभागीय आयुक्त, अमरावती यांना दि.२१ मार्च, २०१८ च्या पत्रान्वये प्रस्ताव सादर केल्याचे दिसून येत आहे.

(२) खरे आहे.

विभागीय आयुक्त, अमरावती यांनी शासनास सादर केलेल्या दि.३१ मे, २०२१ रोजीच्या पत्रामध्ये सदर बाब नमूद करण्यात आली आहे.

(३) विभागीय आयुक्त, अमरावती यांचेकडून उंद्री गावाचे नामांतर उदयनगर असे करण्याबाबत प्राप्त झालेला प्रस्ताव तपासून शासन मान्यतेने दि.०६ ऑक्टोबर, २०२१ च्या पत्रान्वये केंद्र शासनास सहमतीकरीता सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने दि.१७ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनाची सहमती प्राप्त झाल्यानंतर दि.३० मे, २०२२ ची अधिसूचना निर्गमित करण्यात आली असून ती दि.३१ मे, २०२२ रोजीच्या महाराष्ट्र राज्याच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे महानगरपालिका हद्दीतील विकास आराखड्यातील रस्ते अतिक्रमित झाल्याबाबत

(२) ३२६४३ (२३-११-२०२१). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिका हद्दीतील विकास आराखड्यातील रस्ते अतिक्रमित झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्वाधिक अतिक्रमित रस्ते कोथरूड, कर्वेनगर, वारजे, बावधन-भुसारी भागात असून विकास आराखड्यातील विमान नगर-लोहगावला जोडणारा म्हाडा कॉलनी ते व्हीव्हीआयपी विमानतळ रस्ता मुळ मालकाला टीडीआर देऊन ताबे यादी झाली असतांनाही सदर ठिकाणी रस्ता नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित भागाचे अधिकारी आणि विकासक यांच्या संगनमताने आराखड्यातील रस्ते अतिक्रमित करून कागदोपत्री इतरत्र दाखवले जात असल्याचे तसेच महानगरपालिकेच्या बांधकाम विभागातील अधिकारी यांनी आर्थिक संगनमताने महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या रस्त्यांवर नियमबाह्यरित्या बांधकाम करण्यास विकासकाला व खाजगी संस्थांना परवानगी दिली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा प्रकारे महानगरपालिकेच्या ताब्यातील रस्त्यावर फेरफार करून बांधकाम नकाशा मंजूर करणाऱ्या बांधकाम विभागातील अधिकारी व ताबे यादी करूनही सदर मिळकतीचा सातबारा महानगरपालिकेच्या नावावर करण्याची प्रक्रियेत कसूर करणाऱ्यावर तसेच महागरपालिकेच्या रस्त्यांवर अतिक्रमण करून बांधकाम करणाऱ्या बांधकाम व्यावसायिक व संस्था यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१५-०९-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील मिठी नदीच्या काठावरील अनधिकृत बांधकामे निष्कासित करुन रुंदीकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत

(३) ३२८३३ (०२-०२-२०२२). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मिठी नदीच्या रुंदीकरणाचे काम महापालिकेने प्राधान्याने हाती घेतलेले काम आज १६ वर्षांनंतरही एकाही टप्प्याचे काम पूर्ण होऊ शकलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मिठी नदीच्या काठावरील अनधिकृत बांधकामे निष्कासित करुन रुंदीकरणाचे काम युध्द पातळीवर पूर्ण करावे अशी मागणी होत असल्याचे दिनांक ७ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रशासनाच्या दिरंगाईमुळे मिठी नदीचे रुंदीकरण अपूर्णच राहिल्याने मिठी नदीला आलेल्या पुरामुळे रहिवाश्यांची वित्तहानी व जीवितहानी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर बाब अतिशय गंभीर असून अनधिकृत बांधकामे तातडीने निष्कासित करुन मुंबईतील मिठी नदीच्या रुंदीकरणाचे काम तात्काळ करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१५-०९-२०२२) : (१) व २) मिठी नदीच्या संवर्धानासाठी दिनांक १९.०८.२००५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे.

तदनंतर दिनांक २९.०७.२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार, मिठी नदी विकास प्रकल्पाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता मिठी नदीची दोन भागांत विभागणी करण्यात आली आहे.

सदर शासन निर्णयानुसार मिठी नदीची फिल्टरपाडा, पवई ते सी.एस.टी. पूल, कुर्ला दरम्यानची विकासकामे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत व सी.एस.टी. पूल, कुर्ला ते माहिम कॉजवे दरम्यानची विकासकामे एमएमआरडीएमार्फत करण्यात आली आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीत असलेल्या मिठी नदी विकास प्रकल्पाचे काम दोन टप्प्यांमध्ये करण्यात आले असून, त्यापैकी टप्पा-१ अंतर्गत मिठी नदीचे १६ ते ६० मी. रुंदीकरण व गाळ काढण्याचे काम माहे एप्रिल, २००६ ते जून, २००६ दरम्यान पूर्ण करण्यात आले आहे. तसेच, सन २००७ ते सन २०१९ दरम्यान टप्पा-२ अंतर्गत चितळे समिती, केंद्रीय जल व विद्युत संशोधन केंद्र आणि आयआयटी मुंबई यांनी सादर केलेल्या अहवाल/शिफारशीनुसार तसेच मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण यांच्या मान्यतेनुसार मिठी नदीचे अतिरिक्त रुंदीकरण, खोलीकरण, संरक्षक भिंत व सेवा रस्ता बांधण्याचे काम अंतर्भूत केले असून, रुंदीकरण व खोलीकरणाचे काम ९३%, संरक्षक भिंत बांधण्याचे काम ८०% व सेवा रस्ता बांधण्याचे काम १५% इतके पूर्ण झाले आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अखत्यारीतील मिठी नदीच्या ६ किमी. लांबी व वाकोला नाल्याच्या १.८ किमी. लांबीमध्ये करावयाच्या विकास कामांची विभागणी २ टप्प्यांमध्ये करण्यात आली आहे. सदर कामांमध्ये रुंदीकरण, खोलीकरण, संरक्षक भिंत व सुशोभिकरण इ. कामांचा समावेश करण्यात आला आहे.

<u>टप्पा-१</u>

मिठी नदी व वाकोला नाल्यामधून गाळ काढण्याची व शक्य तेथे रुंदीकरण करण्याची सुमारे रु. ३४.५० कोटी खर्चाची कामे माहे मार्च, २००६ ते जून, २००६ मध्ये पूर्ण करण्यात आली आहेत.

<u>टप्पा-२</u>

मिठी नदीचे सरासरी रुंदीकरण ३० मी. व वाकोला नाल्याचे सरासरी रुंदीकरण १० मी. एवढे करण्यात आले आहे. तसेच टप्पा-१ चे काम पूर्ण झाल्यामुळे नदीची जलवहन क्षमता आणि जलधारण क्षमता १.५ पटीने वाढली असल्यामुळे पाण्याचा निचरा जलद होऊन प्रदुषण कमी झाल्याने पर्यावरणामध्ये सुधारणा झाली आहे.

टप्पा-२ च्या कामाची प्रशासकीय मान्यतेची रक्कम रु. ५७०.७६ कोटी इतकी असून, त्यापैकी रु. ५०३.९० कोटी इतका खर्च झाला आहे. मिठी नदी विकास व संरक्षक प्राधिकरणाने दिनांक २५ मे, २०१० रोजी झालेल्या ६ व्या बैठकीत मिठी नदी व वाकोला नाल्याच्या सीमांकन आराखड्यास मंजुरी दिल्याप्रमाणे मिठी नदी व वाकोला नाल्याचे रुंदीकरणाचे काम जवळपास पूर्ण झाले असून, खोलीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. टप्पा-२ चे काम पूर्ण झाल्यानंतर मिठी नदीची वहन क्षमता तिपटीने व जलधारण क्षमता दुपटीने वाढल्याबाबत अहवाल सी.डब्ल्यू.पी.आर.एस., पुणे या संस्थेने दिनांक ११ नोव्हेंबर, २०११ रोजी दिला आहे. तसेच सदर कामामुळे मिठी नदीचे प्रदुषण बऱ्याच प्रमाणात कमी होऊन पर्यावरणामध्ये सुधारणा झाली आहे.

सन २०१९ नंतर एमएमआरडीएच्या अखत्यारीत असलेल्या मिठी नदीचे (सी.एस.टी. पूल कुर्ला ते माहिम कॉजवे दरम्यान) उर्वरित रुंदीकरण, खोलीकरण, संरक्षक भिंत व सेवा रस्ता बांधण्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मिठी नदी प्रदूषण नियंत्रण (गट क्र. ३) प्रकल्पात अंतर्भूत करण्यात आले असून, आजमितीपर्यंत एकूण उर्वरित ४०७५ मी. लांबी पैकी ४०० मी. लांबीचे संरक्षक भिंत बांधण्याचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत व त्यातील बहुतांश भाग अतिक्रमणे, न्यायालयीन प्रकरणे, खाजगी जागेचे अधिग्रहण इत्यादीमुळे बाधीत आहे. भरती प्रवण क्षेत्रातील मिठी नदी व वाकोला नदीत विविध पातमुखांद्वारे उत्सर्जित होणारे सांडपाणी अडवून मुख्य मलनि:सारण वाहिन्यांमध्ये वळविणे, उदंचन पंप सुविधेसह पूर प्रतिबंधक दरवाजे (फ्लड गेट) बांधणे, प्रामनेड बांधणे इत्यादी कामांचा देखील अंतर्भाव करण्यात आला आहे. सदर कामाचे मसुदा निविदा तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३), (४) व (५) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पूर्व विभागांतर्गत येणारी मिठी नदी रुंदीकरणासाठी आवश्यक असलेली बांधकामे यापूर्वीच निष्कासित करण्यात आली आहेत व एच/पश्चिम विभागाच्या हद्दीत असलेल्या माहिम खाडीच्या काठावर एकही अनधिकृत बांधकाम नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

मुंबईतील “फ्री एक्सप्रेस वे ” ला स्व.विलासराव देशमुख यांचे नाव देण्याबाबतचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

(४) ३३४३० (०१-०२-२०२२). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.संदिप क्षिरसागर (बीड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चेंबूर ते पी डीमेलो रोड (बोरीबंदर) रस्ता तत्कालीन मुख्यमंत्री स्व.विलासराव देशमुख यांचे कार्यकाळात विकसित होऊन ईस्टर्न फ्री वे महामार्ग म्हणून १२ वर्षापासून स्थापित झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर “ईस्टर्न फ्री वे” महामार्गाला तत्कालीन मुख्यमंत्री स्व.विलासराव देशमुख याचे नाव देण्याचा निर्णय शासनाने त्याचवेळी घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर “ईस्टर्न फ्री वे” महामार्गाला तत्कालीन मुख्यमंत्री स्व.विलासराव देशमुख यांचे नाव देण्याबाबत मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी नगरविकास विभागाला आदेशित केले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी गत १२ वर्षापासून प्रलंबित असलेल्या या प्रस्तावावर शासनस्तरावर कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे दिनांक ३ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने घेतलेल्या सदर निर्णयाबाबत अद्याप कार्यवाही न होण्याची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-०९-२०२२) : (१) हे खरे आहे.

सदर फ्री-वे चे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत (एमएमआरडीए) करण्यात आले असून, तो दिनांक ०२.०५.२०१५ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत केला आहे.

(२), (३), (४) व (५) सदर फ्री-वे ला तत्कालीन मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख यांचे नाव देण्यास शासन मान्यता दिलेली असून त्याअनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

उटी (देळप) (ता.मेहकर, जि. बुलढाणा) येथे सप्तऋषी निसर्ग पर्यटन केंद्र कामात झालेला गैरव्यवहार

(५) ३३४६७ (११-०१-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उटी (देळप) (ता.मेहकर, जि. बुलढाणा) येथे निसर्गाच्या सान्निध्यात निर्माण करण्यात आलेले सप्तऋषी निसर्ग पर्यटन केंद्राच्या कामातील गैरव्यवहारामुळे तसेच वन विभागाच्या दुर्लक्षपणामुळे निसर्ग पर्यटन केंद्राची हानी झाली असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२१ रोजीच्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, या प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०९-२०२२) : (१) हे खरे नाही.

उटी (देळप) ता.मेहकर, जि.बुलडाणा येथे निसर्गाच्या सान्निध्यात निर्माण करण्यात आलेले सप्तऋषी निसर्ग पर्यटन केंद्राची सन २०१२ ते सन २०१६ या कालावधीमध्ये उडता झुला, दोन हेक्टर क्षेत्रावर फळझाडे, औषधी रोपे लागवड, माहिती फलक तयार करणे, सिमेंट बेंच लावणे, चेनलिंक फेन्सिंग ही कामे करण्यात आलेली होती. सदर कामांकरिता रु.१८,९४,९७१/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे.

सदर कामांची संबंधित वन परिक्षेत्राशी संबंधीत नसलेल्या सहाय्यक वनसंरक्षक (प्रादेशिक) (कॅम्पा) बुलडाणा यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असून, सदर कामे प्रत्यक्षात मोकास्थळी आढळून आली असल्याने त्या कामांमध्ये भ्रष्टाचार झाल्याबाबतची बाब चौकशी दरम्यान आढळून आली नाही. तसेच सदर निसर्ग पर्यटन केंद्र देळप येथे निर्माण केलेल्या कामाची निगा / परिरक्षण झाले नसल्याने निर्माण कामे कालांतराने काही प्रमाणात जिर्ण व मोडकळीस आलेली आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

वाघाळा शहर (जि.नांदेड) महानगरपालिकेच्या मालकीची महात्मा फुले व्यापारी संकुल व सभागृहाची जागा पुनर्विकासाच्या नावाखाली ९० वर्षासाठी लिजवर दिल्याबाबत

(६) ३३६३० (११-०१-२०२२). श्री.राजेश पवार (नायगांव) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाघाळा शहर (जि.नांदेड) महानगरपालिकेच्या मालकीच्या महात्मा फुले व्यापारी संकुल व सभागृहाची जागा पुनर्विकासाच्या नावाखाली खाजगी विकासकाला शासनाची कोणतीही मान्यता न घेता ९० वर्षासाठी लिजवर दिली असल्याची बाब माहे जून २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागा पी.आर. कार्डवर मालमत्ता व्यवस्थापक यांच्या नावावर नोंद असताना खाजगी विकासकाला जागा हस्तांतरण व लिजचा करार करण्यासाठी अभियांत्रिकी पदवीधारक पदोन्नत कार्यकारी अभियंता यांना अधिकार प्रदान केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तसे करार करण्याचा अधिकार व अर्हता तांत्रिक अधिकाऱ्यास नसल्याने होणाऱ्या नुकसानीची जबाबदारी कोणावर निश्चित करण्यात आली आहे तसेच उक्त प्रकरणी खाजगी विकासकाला शासन पाठीशी घालत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२३-०९-२०२२) : (१) होय, हे खरे आहे, नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मालकीच्या महात्मा फुले मार्केट पी.पी.पी. तत्वावर विकसीत करण्यासाठी सर्वसाधारण सभा ठराव क्र.२२ दि.२.४.२०१३ व ठराव क्र.१४६ दि.२७.२.२०१७ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९(क) नुसार महानगरपालिकेच्या जागे बाबत निर्णय घेण्यासाठी महानगरपालिकेला अधिकार आहे. त्यानुसार सदर प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. असे, आयुक्त, नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(२) हे खरे आहे, महात्मा फुले मार्केट पी.पी.पी. तत्वावर विकसित करण्यासाठी विकासकासोबत झालेल्या जागा हस्तांतरण व लिज करार या मधील समावेशक सर्व बाबी मालमत्ता व्यवस्थापक व कायदे सल्लागार यांच्या सल्यानेच समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६९(१) नुसार आयुक्त यांना एखाद्या अधिकाऱ्यास अधिकार प्रदान करण्याचे अधिकार असल्याने सदर करारनामा करण्यास कार्यकारी अभियंता यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.
(३) हे खरे नाही, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६९(१) नुसार आयुक्त यांना एखाद्या अधिकाऱ्यास अधिकार प्रदान करण्याचे अधिकार असल्याने सदर करारनामा करण्यास कार्यकारी अभियंता यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

उस्मानाबाद शहरातील वक्फ बोर्डाच्या मालकीच्या जमीनीवर नागरी सुविधा पुरविणेबाबत

(७) ३३७२७ (१२-०१-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद शहरात वक्फ बोर्डाची जवळपास २३७ एकर जमीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू जमीनीवर लहान व मोठया अशा बऱ्याच इमारती असून तेथे हजारो नागरीक वास्तव्य करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू इमारती नियमीत करुन तेथे राहणाऱ्या नागरीकांना नागरी सुविधा पुरविणे व उर्वरित जमीनीवर पंतप्रधान आवास योजना राबवुन सर्वसामान्य जनतेस त्याचा लाभ मिळावा म्हणुन दिनांक २८ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास लोकप्रतिनिधीच्या उपस्थितीत बैठकीचेही आयोजन केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू बैठकीमध्ये कोणकोणते ठराव घेण्यात आले होते व त्याची अंमलबजावणी झाली आहे काय,
(४) असल्यास, सदरहू बैठकीच्या अनुषंगाने तेथे राहणाऱ्या नागरीकांस नागरी सुविधा पुरविणे व पंतप्रधान आवास घरकुल योजना राबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय वा करण्यात येत आहे ,
(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०८-०९-२०२२) : (१) उस्मानाबाद शहर परिसरात वक्फ मंडळाच्या अधिपत्याखालील वक्फ संस्थांची सुमारे ४०० एकर जमिन आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.

उस्मानाबाद शहरातील वक्फ मंडळाच्या जमिनीवर नागरी सुविधा निर्माण करणे, प्रधानमंत्री आवास योजना राबविणे याबाबत मंत्री, अल्पसंख्यांक विकास यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २८.०१.२०२० रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती.
(४) व (५) उस्मानाबाद शहरातील दर्गाह हजरत ख्वाजा शमशोद्दीन गाजी व जामा मस्जिद या वक्फ संस्थेच्या जमिनीवर वास्तव्य करीत असलेल्या कुटूंबांची संख्या, ताब्यात असलेली जमिन, घरपट्टी, इत्यादीचा तपशील जमा करणे तसेच सदर जमिन भाडे करारानुसार देणे वा तेथे प्रधानमंत्री आवास योजनेचा पथदर्शी प्रकल्प राबविण्याबाबत पडताळणी करणे अशा आशयाचे निदेश मंत्री, अल्पसंख्यांक विकास यांनी दिनांक २८.०१.२०२० रोजीच्या बैठकीत दिले होते. त्यानुसार पुढील कार्यवाहीसाठी उस्मानाबाद, नगरपरिषद यांच्याकडून माहिती मागविण्यात आलेली आहे.

वक्फ मालमत्तांचे संनियंत्रण वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतुदींनुसार करण्यात येते. घरकुल योजना राबविण्यासाठी वक्फ मालमत्ता देण्याबाबत सदर अधिनियामध्ये तरतुद नाही. सदर अधिनियमाच्या कलम ५६ तसेच भाडेपट्टा नियम, २०१४ मधील तरतुदीनुसार वक्फ मालमत्ता भाडेकरानुसार देण्याबाबत तरतुद आहे. त्यानुसार विहित प्रक्रिया राबवून शासनाच्या पुर्वमान्यतेने वक्फ मालमत्ता ३० वर्षांच्या कालावधीसाठी भाडेपट्ट्याने देण्यात येतात.
(६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.

वडगांवशेरी (जि.पुणे) येथील लोहगाव ५०९ ते लोहगाव गावाकडे जाणाऱ्या रस्त्याबाबत

(८) ३३८८६ (१७-०१-२०२२). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडगांवशेरी (जि.पुणे) येथील लोहगाव ५०९ ते लोहगाव गावाकडे जाणारा रस्ता वायुसेनेकडून बंद करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याला पर्यायी रस्ता म्हणून बुर्माशेल झोपडपट्टीला लागून ३० मीटर रस्ता कलम २०५ अन्वये आखण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कलम २०५ अन्वये आखण्यात आलेला रस्त्याची भूसंपादनाची कार्यवाही केव्हापर्यंत सुरु करण्यात येणार असून, यासंदर्भात वायूसेने सोबत बैठका झाल्या आहेत काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी रस्त्यांचे भूसंपादन झाले नसल्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१५-०९-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) भूसंपादनाची कार्यवाही सुरु करण्यात येत असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

वडगावशेरी (जि.पुणे) धानोरी स.नं. ५ ते १२ दिघी लोहगाव गाव रस्ता संरक्षण विभागाने बंद केल्याबाबत

(९) ३३८८८ (११-०१-२०२२). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडगाव शेरी (जि.पुणे) धानोरी स.नं. ५ ते १२ दिघी लोहगाव हा गाव रस्ता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता हा संरक्षण विभागाने राडारोडा टाकून बंद केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रस्ता बंद केल्याने नागरिकांना ५ ते ६ किलोमीटर अंतर फिरून जावे लागत असल्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रस्ता हा संरक्षण विभागाच्या मालकीचा आहे काय, असल्यास, सदर प्रकरणी शासनाने या संदर्भात पत्रव्यवहार केला वा करण्यात आला आहे काय,

(५) नसल्यास, संरक्षण विभागाने कोणत्या नियमखाली रस्ता बंद केला आहे ?

श्री. एकनाथ शिंदे (१५-०९-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) धानोरी स. नं.५ ते स. नं. १३ पर्यंतचा रस्ता संरक्षण विभागाने बंद केल्याने परिसरातील नागरीकांना धानोरी मुख्य रस्त्याने सुमारे ५ ते ६ कि.मी. अंतर जास्त फिरुन जावे लागते तसेच पोरवाल रस्ता हा एकच मुख्य रस्ता उपलब्ध असल्याने पोरवाल रस्त्यावर वाहतुकीचा ताण येऊन पर्यायाने वाहतूक कोंडी वारंवार होत असते. सदर रस्त्याबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडे श्री. सुनिल टिंगरे, मा. विधानसभा सदस्य व संरक्षण विभागाकडील अधिकारी यांच्या समवेत संयुक्त बैठक दिनांक २१/४/२०२२ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. तथापि, सदर बैठकीमध्ये सदर रस्त्याबाबत कोणताही निर्णय झालेला नाही.

(४) व (५) स. नं. ५ ते १२ यादरम्यान मध्यभागी स.नं. १३ ही मिळकत पूर्णपणे संरक्षण विभागाच्या मालकीची आहे. सदर रस्ता गाव नकाशाप्रमाणे सार्वजनिक गाव रस्ता असल्याचे निदर्शनास येते. पुणे महानगरपालिकेकडील पथ विभागाने दिनांक १२/१२/२०१८ अन्वये संरक्षण विभाग, पुणे यांच्याकडे पत्रव्यवहार केलेला आहे. अद्याप याबाबत कोणताही निर्णय संरक्षण विभागाकडून प्राप्त झालेला नाही, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

नागपूर महानगर पालिका अंतर्गत हनुमान नगर झोन येथील कार्यकारी अभियंता यांनी कायदा व राजशिष्टाचाराचा भंग केल्याने निलंबित करण्याबाबत

(१०) ३३९७६ (१७-०१-२०२२) श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगर पालिका अंतर्गत हनुमान नगर झोन येथील कार्यकारी अभियंता यांनी कायदा व राजशिष्टाचाराचा भंग करून स्थानिक लोकप्रतिनिधीचे चरित्र हनन केल्यामुळे त्यांचे तात्काळ निलंबन करून त्यांनी मार्च २०१९ पर्यंत केलेल्या कामाची चौकशी वास्तू व बांधकाम तज्ञांकडून करण्याबाबतचे पत्र स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांना दिनांक १६ ऑक्टोबर, २०२० व १३ एप्रिल, २०२१ रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कायदा व राजशिष्टाचाराचा सर्रास भंग करून लोकप्रतिनिधींची प्रतिमा मलीन करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१५-०९-२०२२) : (१) व (२) कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांना निलंबित करून त्यांनी मार्च २०१९ पासून आजतगायत केलेल्या कामाची चौकशी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दि.१६.१०.२०२० रोजी पत्र दिले आहे. याबाबत नागपूर महानगरपालिकेकडून संबंधीत कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांच्याकडून दि.०३.११.२०२० च्या पत्रान्वये खुलासे मागविण्यात आले होते. कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांनी अनुक्रमे दि.०९.११.२०२० व दि.१०.११.२०२० च्या पत्रान्वये मा.लोकप्रतिनिधिंना कोणतीही चुकीची व खोटी माहिती सादर केलेली नसुन चारित्र्यहरन व राजशिष्टाचाराचा भंग केलेला नसल्याबाबत खुलासा सादर केला. सदर दोन्ही खुलासे नागपूर महानगरपलिकेने मान्य केले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

उल्हासनगर (जि.ठाणे) येथील अनधिकृत बांधकामाबाबत दिलेल्या पत्रावर कार्यवाही होत नसल्याबाबत

(११) ३४२०९ (०२-०२-२०२२). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) मध्ये मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे होत असून या अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करावी तसेच त्यांना सहाय्य करणाऱ्या महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त यांच्याकडे दिनांक ६ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनधिकृत बांधकाम करताना कोरोनाचे कोणतेही नियम पाळत नसून रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांना मास्क घातला नाही तरी त्यावर कार्यवाही होते परंतु या मास्क न घालणाऱ्या कामगार आणि ठेकेदारांवर कोणतीही कार्यवाही करण्यात येत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी पसरत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उल्हासनगर महानगरपालिकेने अनधिकृत बांधकामावर कारवाई करून त्याचा अहवाल लोकप्रतिनिधी यांना देण्यांत यावा असे निर्देश असतांनाही लोकप्रतिनिधी यांना कोणत्याही प्रकारचे उत्तर दिले जात नसल्याने हा लोकप्रतिनिधी यांचा अपमान झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच महानगरपालिकेचे अधिकारी मा.लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या पत्राची दखल घेत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, अनधिकृत बांधकाम करणाऱ्या संबधितांवर तसेच त्यांना सहाय्य करणाऱ्या अधिकाऱ्यावर महानगरपालिका व शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-०९-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही असे उल्हासनगर महानगरपालिकेने कळविले आहे.
(३), (४) व (५) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या निर्देशानुसार उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत अनधिकृत बांधकामांवर वेळोवेळी कारवाई करण्यात येत आहे.
तसेच, स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या दिनांक ०६.०५.२०२१ रोजीच्या तक्रारीच्या अनुषंगाने प्रभाग समिती निहाय अनधिकृत बांधकामांवर दिनांक ०१.०५.२०२१ ते दिनांक ०१.१०.२०२१ या कालावधीत केलेल्या कारवाईची माहिती दिनांक ०१.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये स्थानिक लोकप्रतिनिधी यांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे असे उल्हासनगर महानगरपालिकेने कळविले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर शहरातील डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठाच्या अतिक्रमित जागेवरील बांधकामांना मुलभूत सेवा पुरविल्याबाबत

(१२) ३४३९६ (१७-०१-२०२२). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठाचे, काचीपूरा, रामदासपेठ येथे जागेवर अतिक्रमण करून त्याठिकाणी विविध व्यवसाय करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अतिक्रमित बांधकामांना मनपा, नागपूर यांनी रस्ते, नळ जोडणी, विज पुरवठा, सिवर लाईन व इतर मुलभूत सुविधा पुरविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागपूर महानगरपालिकेने कोणत्या नियमाअंतर्गत या अतिक्रमित बांधकामांना उपरोक्त सुविधा पुरविल्या आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन उक्त सुविधा मंजुर करुन पुरविणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१६-०९-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) प्रत्यक्ष मौकानुसार अतिक्रमण धारकांना मनपातर्फे रस्ते, सिवरलाईन इत्यादी मुलभूत सुविधा उपलब्ध करण्यात आलेल्या नाही. (स्वत: सेप्टीक टॅंक तयार केल्याचे आढळले) तथापि या ठिकाणी एकूण ६ व्यावसायिक नळ जोडणी आहे. सदर नळजोडण्या दि. ०३.०५.२०११ ते २६.०६.२०१३ दरम्यानच्या आहेत. तदनंतर कृषी महाविद्यालयाचे दि.०७.१०.२०१३ चे आक्षेप पत्रानंतर कुठलीही नळ जोडणी देण्यात आली नाही.
(३) सदर नळ जोडण्या नागपूर शहर महानगरपालिका पाणीपट्टी दर व मुल्यांकन आणि वसुली उपविधी १६ एप्रिल २००९ मधील उपविधी १३ अन्वये देण्यात आल्या आहेत.

(४) सदर नळ जोडण्या नागपूर शहर महानगरपालिका पाणीपट्टी दर व मुल्यांकन आणि वसुली उपविधी नुसार देण्यात आल्याने अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर शहरातील ८५४ सार्वजनिक विहिरींचे पाणी दुषित झाल्याबाबत

(१३) ३४४०५ (१७-०१-२०२२). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील ८५४ सार्वजनिक विहिरीतील पाणी नागपूर महानगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे दुषीत झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विहिरींचे पाणि दुषीत होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर विहिरींमधील दुषित झालेले पाणी वापरण्यायोग्य करण्यास महानगरपालिकेने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबांची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१५-०९-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.
नागपूर शहरात एकूण ८९५ सार्वजनिक विहिरी आहेत. त्यापैकी ७२० विहिरी प्रत्यक्ष उपयोगात आहेत. यापैकी ५४९ विहीरींच्या पाण्याच्या नमून्याची तपासणी शासनाच्या प्रादेशिक आरोग्य प्रयोगशाळा, नागपूर येथे करण्यात आली. यामध्ये ५ विहीरींच्या पाण्याचे नमूने पिण्यास योग्य आढळून आले व ५४४ विहीरींचे तपासणी अहवालातील Chemical analysis नुसार Nitrates, Iron, Odour, Turbidity व Bacteriological analysis नुसार कोलीफार्म्स व थर्मोटॉलरंट जीवाणूची मात्रा १६ पेक्षा जास्त आढळून आल्यामुळे या विहीरींचे पाणी पिण्यास अयोग्य आढळून आले.
(२) पावसाळ्याचे पाणी वाहून नेणाऱ्या पाईपलाईन, नाल्या तसेच सिव्हर लाईन जुन्या असल्याने यामधून गळती होवून पाणी जमीनीत मुरते व अशा पाण्याचे झरे विहीरीला मिळत असल्याने तसेच परिसरातील नागरिकांकडून विहीरींमध्ये निर्माल्य व कचरा टाकण्यात येतो. त्यामुळे सुध्दा विहीरींचे पाणी दुषित होण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे विहीरींच्या पाण्यात Chemical analysis नुसार Nitrates, Iron, Odour, Turbidity व Bacteriological analysis नुसार कोलीफार्म्स व थर्मोटॉलरंट जीवाणूची मात्रा १६ पेक्षा जास्त आढळून आली.
(३) शहरातील सार्वजनिक व खाजगी विहीरींचे पाणी दुषित होवून नये त्याचप्रमाणे जुन्या व जीर्ण सिव्हर लाईन, चेंबर्स दुरुस्तीकरीता महानगरपालिकेव्दारे सन २०२१-२२ या वित्तीय वर्षामध्ये शहरातील दहाही झोनअंतर्गत ६०.०० कि.मी. सिव्हर लाईन दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली असुन कामास सुरुवात झाली आहे.
तसेच नागपूर महानगरपालिकेतर्फे दरवर्षी सार्वजनिक विहीरी साफ करण्याची मोहिम हाती घेण्यात येते. उपयोगात असलेल्या ७२० विहीरींपैकी वर्ष २०१९-२० मध्ये ५०२ विहीरीमधील गाळ काढून विहीरी स्वच्छ करण्यात आल्या व वर्ष २०२१-२२ मध्ये १४८ विहिरीतील गाळ काढून विहिरी स्वच्छ करण्यात आल्या. अशा प्रकारे एकूण ६५० सार्वजनिक विहीरी स्वच्छ करण्यात आल्या असुन पिण्याव्यतिरित इतर वापराकरीता नागरिक या पाण्याचा वापर करीत आहेत.
नागरिकांना सुचित करण्याच्या हेतूने दुषित पाणी असलेल्या विहीरीवर "पाणी पिण्यास अयोग्य" असे दर्शविणारे फलक सुध्दा लावण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे महापालिकेच्या पंडीत दीनदयाळ उपाध्याय अपघात विमा योजनेचा लाभ बाधित कुटुंबांना मिळण्याबाबत

(१४) ३४४७३ (०२-०२-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), अॅड.अशोक पवार (शिरुर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महापालिकेने मिळकत करदात्या नागरीकांसाठी पंडीत दीनदयाळ उपाध्याय अपघात विमा योजना मागील तीन वर्षापूर्वी सुरु केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेअंतर्गत, निवासी मिळकत धारकांच्या कुटुंबात तो स्वत: त्याची पत्नी किंवा पती यांच्यावर अवलंबून असलेली २३ वर्षाखालील पहिली अविवाहीत दोन अपत्ये, मिळकत कर दात्याचे आईवडील अशाना योजनेअंतर्गत विम्याची रक्कम देण्याची तरतूद आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, या विमा योजनेसाठी महापालिका दरवर्षी चार ते पाच कोटी रुपये रक्कम प्रिमियमपोटी विमा कंपनीला देत असून महापालिकेने साडेसात लाख नागरीकांचा विमा सदर कंपनीकडे उतरविलेला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, मागील तीन वर्षात चारशेपेक्षा अधिक लोकांचा अपघाती मृत्यु झालेला असतांना त्यापैकी केवळ ८३ कुटुंबांनाच या योजनेचा लाभ मिळाला असल्याचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, महापालिकेने साडेसात लाख मिळकत करदात्यांचे पैसे विमा कंपनीकडे भरले असतांना व चारशेपेक्षा अधिक लोकांचे मृत्यु झाले असताना केवळ ८३ कुटुंबांना देण्यात आलेला लाभ याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उर्वरित कुटुंबांना योजनेचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१५-०९-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) हे खरे नाही.

मागील तीन वर्षात पुणे महानगरपालिकेकडील मिळकतकर भरणाऱ्यापैकी एकूण १२७ मूत्यू हे अपघाताने झाले असल्याचे निष्पन्न झाले आहे व इतर मृत्यू हे पुणे महानगरपालिकेच्या हद्दीबाहेरील व अपघाताव्यतिरिक्त इतर कारणामुळे झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

पुणे महानगरपालिकेकडे १२७ विमा दावे आलेले असून त्यातील १०३ विमा दावे निकाली काढण्यात आले असून त्यांच्या कुटुंबियांना पुर्ण लाभ मिळाला आहे व उर्वरीत १३ विमा दाव्यांच्या कागदपत्रांची छानणी सुरु आहे व ११ विमा दावे विमा योजनेतील पात्रता निकषांमध्ये बसत नसल्यामुळे अपात्र आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे महानगरपालिकेच्या वानवडी-रामटेकडी येथील क्षेत्रीय कार्यालयातील सहाय्यक आयुक्तांच्या वारंवार बदल्या करण्यात आल्याबाबत

(१५) ३४४७८ (१७-०१-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), अॅड.अशोक पवार (शिरुर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या वानवडी-रामटेकडी क्षेत्रीय कार्यालयाचे काम पाहण्यासाठी माहे मार्च, २०२० ते जून, २०२१ या कालावधीत महिना चार महिन्याच्या फरकाने सहा सहाय्यक आयुक्तांच्या नियुक्ती व बदल्या करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहाय्यक आयुक्तांच्या वारंवार नियुक्त्या वा बदल्या केल्याने त्याचा कार्यालयीन कामावर विपरीत परिणाम होऊन निर्णय सक्षम अधिकारी नसल्याने नागरीकांना अनेकदा त्रास सोसावा लागत असल्याचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, महापालिकेच्या वानवडी-रामटेकडी क्षेत्रीय कार्यालय येथे शासन धोरणानुसार निदान तीन वर्षे तरी कार्यकाळ पूर्ण करणारे अधिकारी नियुक्त करण्यात यावेत अशी पुणे महानगरपालिका प्रशासनाकडे तसेच शासनाकडे स्थानिक जनतेकडून वारंवार मागणी करण्यात आली असल्याचे त्याचसुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१५-०९-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) पुणे महानगरपालिकेच्या वानवडी-रामटेकडी येथील क्षेत्रिय कार्यालयातील सहाय्यक आयुक्तांच्या वारंवार बदल्या करण्यात आल्याबाबत नागरिकांच्या तक्रारी प्राप्त झाल्या नसल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
तसेच दि.२८/०७/२०२१ पासून वानवडी-रामटेकडी येथील क्षेत्रिय कार्यालय येथे पूर्ण वेळेकरिता सहाय्यक आयुक्त यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महापालिकेच्या अखत्यारितील बेस्ट वाहतूक संस्थेने डिजिटल तिकिटासाठी काढलेली निविदा खासगी संस्थेला दिल्याबाबत

(१६) ३५२६२ (०२-०२-२०२२). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई बेस्ट उपक्रमाची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी मुंबई महापालिकेकडून करोडो रुपये अनुदान मिळविणाऱ्या बेस्ट प्रशासनाने बेस्ट डिजिटल तिकीट निविदा प्रक्रिया राबविताना नियमांची पायमल्ली केल्याने कोट्यावधी रुपयाचे नुकसान होत असल्याबाबतची बाब माहे सप्टेंबर २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून, सदर खाजगी संस्थेची तक्रार मा.मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रक्रिया पुन्हा नव्याने राबविण्याची मागणी पालिकेतील लोकप्रतिनिधीनी केली आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, बेस्ट प्रशासनाने डिजिटल तिकीटीच्या अंमलबजावणीसाठी दिनांक ३० जुलै २०२१ रोजी काढलेल्या निविदेत २० संस्था पात्र ठरत असताना विशिष्ट कंत्राटदारासाठी बनविलेल्या निकषामुळे फक्त ३ निविदाकारांनी सहभाग घेतला असून, त्यातही इतर दोन संस्थांना किरकोळ त्रुटी दाखवून त्यांना अपात्र ठरवून, एक संस्था निविदेसाठी पात्र झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, किमान तीन संस्था निविदेसाठी पात्र होत नाहीत तो पर्यत पुन्हा नव्याने निविदा काढण्याचा सर्वसाधारण नियम असतानाही त्या नियमास बगल देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच सदर नविन तिकीट प्रणालीमुळे निविदेमुळे बेस्ट उपक्रमाचा होणारा कोट्यावधी रुपयाचा तोटा भरुन काढण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-०९-२०२२) : (१) अशा आशयाची तक्रार प्राप्त झालेली नाही.
(२) सदर प्रक्रिया पुन्हा नव्याने राबविण्याची मागणी बृहन्मुंबई महानगरपालिकेतील लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे खरे आहे.

(३) बेस्ट उपक्रमाने "बेस्ट डिजिटल तिकिट प्रणाली" या प्रकल्पाचे कंत्राट ठरविलेल्या खरेदी मार्गदर्शक तत्वानुसार निविदा मागविल्या होत्या. त्यानुसार प्राप्त तीन निविदा उघडून त्यांचे व्यावसायिक व तांत्रिक बाबी तपासून दोन निविदाकारांच्या निविदा पात्र ठरविण्यात आल्या व एका निविदाकाराला पात्रता निकषातील त्रुटींमुळे अपात्र ठरविण्यात आले, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) किमान तीन संस्थांचा निविदेमध्ये सहभाग असल्याने व त्यातील दोन निविदाकार पात्र झाले आहेत. त्यामुळे कोणत्याही सर्वसाधारण नियमाला बगल देण्यात आली नाही.
सदर प्रकल्प कार्यान्वित झालेला असून त्या संदर्भातील काम उत्तमरित्या व निविदेतील नियमांना अनुसरुन चालू झाले असून, यातून तोटा झालेला नाही. तथापि यापूर्वीच्या अशाच प्रकल्पापेक्षा या प्रकल्पाचे दर अंदाजे रुपये २३ कोटींनी कमी असल्याने बचत झाली आहे, असे बेस्ट प्रशासनाने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्या नजिकच्या परिसरातील अनधिकृत गॅरेज व दुकान / गाळयांसमोरील अनधिकृत शेड्स तातडीने निष्कासित करण्याबाबत

(१७) ३५४१४ (१७-०१-२०२२). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्यावरील (जेव्हीएलआर) प्रतापनगर, सातबावडी, सारीपुत नगर, दुर्गानगर एम.एम.आर.डी. कॉलनी या परिसरात अनधिकृत गॅरेजची संख्या ही दिवसेंदिवस वाढत असून सद्य:स्थितीत सदरहू अनधिकृत बांधकामे ही बेकायदेशीररित्या दुमजली करण्यात येवून या रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या दुकानांपैकी काही दुकानदार व गाळेधारकांनी दुकानासमोरील जागेत अनधिकृतरित्या शेड उभारल्या असल्याची बाब माहे मार्च-एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्यावरील अनधिकृत गॅरेजमध्ये दुरूस्तीकरिता येणारी वाहने रस्त्यावरच अनधिकृतरित्या उभी करून दुरूस्त केली जात असल्याने या रस्त्यावरील वाहतुकीस मोठया प्रमाणात कोंडी होत असून अपघातांच्या संख्येतही लक्षणीय वाढ होत आहे तसेच या परिसरालगतच्या ट्रामा केअर सेंटरमध्ये या मार्गावरून जाणाऱ्या रुग्णवाहिका, स्थानिक रहिवासी व प्रवासी यांना मोठया प्रमाणात त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू अनधिकृत गॅरेज व या रस्त्यांवरील दुकाने / गाळे यांनी त्यांच्या दुकानासमोर उभारलेल्या अनधिकृत शेड्स तातडीने निष्कासित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान तसेच यापूर्वीही वारंवार सहाय्यक आयुक्त, के-पूर्व तसेच संबंधित प्रभाग अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे तक्रारअर्ज सादर करूनही या प्रकरणी संबंधित अधिकारी जाणीवपूर्वक व हेतू:पुरस्सरपणे दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) नसल्यास, उक्त नमूद निवेदनाच्या अनुषंगाने सदरहू अनधिकृत गॅरेज व अनधिकृत शेड निष्कासित करण्याबाबत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे, असल्यास त्याचा तपशील काय आहे,
(५) तसेच सदर अनधिकृत बांधकामाबाबत प्रशासनाकडून निष्कासन कारवाई संदर्भात संबंधित अधिकारी यांचेकडून असमाधानकारक उत्तरे दिली जात असून सदरहू अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची जुजबी व तात्पुरती कारवाई केली असता त्याच दिवशी सदरहू अनधिकृत बांधकामे पुन्हा नव्याने करण्यात येत असताना त्याविरूध्द संबंधित वॉर्ड ऑफिसरकडून कोणत्याही प्रकारची कठोर कारवाई होत नसल्याने या कामांना अप्रत्यक्षरीत्या प्रशासकीय यंत्रणाच कारणीभूत ठरत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सदर प्रकरणी कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत व या प्रकरणी कारवाईस विलंब करणारे तसेच निष्कासनाच्या कारवाईनंतर पुन्हा त्याच जागेवर नव्याने होणाऱ्या अनधिकृत बांधकामांना प्रोत्साहन देणारे संबंधित प्रभाग अधिकारी व जबाबदार अधिकारी / कर्मचारी यांचेवर तातडीने कठोर कारवाई करून सदरहू अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१५-०९-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. सदर गॅरेजेस जोगेश्वरीकडून विक्रोळीकडे जाणाऱ्या उत्तर वाहिनीवर आहेत व ट्रॉमा केअर रुग्णालय विक्रोळीकडून जोगेश्वरीकडे येणाऱ्या दक्षिण वाहिनीवर आहे.

सदर ठिकाणी वाहतुकीस व रहदारीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांवर वाहतुक विभागामार्फत नियमितपणे ई-चलन कारवाई करण्यात येत असते.

तसेच दिनांक २३ मार्च, २०२० रोजी मुंबईमध्ये लॉकडाऊन लावण्यात आला होता. त्यामुळे रस्त्यावर वाहतुकीची वर्दळ व परिणामी वाहतूक कोंडी कमी प्रमाणात होती असे गृह विभागाने कळविले आहे.
(३), (४), (५) व (६) सदर ठिकाणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दुकानासमोरील जागेत उभारलेल्या अनधिकृत शेड्सच्या निष्कासनाची कारवाई दिनांक ०४.०१.२०२१, ०७.०१.२०२१, ०२.०९.२०२१ व दिनांक २२.११.२०२१ रोजी करण्यात आली आहे.

तसेच, संबंधित दुकाने दुमजली नसून, तळमजला पोटमाळा स्वरुपाचे आहे व सदर अनधिकृत बांधकामास मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ अन्वये नोटीस बजावण्यात आली असून पुढील कार्यवाही महानगरपालिकेच्या नियमानुसार करण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

केज व अंबाजोगाई, (जि. बीड.) येथे अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून देणे बाबत

(१८) ३५७५२ (११-०१-२०२२) श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज व अंबाजोगाई (जि.बीड) तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागातील जवळपास ३२ रस्ते अतिवृष्टीमुळे नादुरुस्त झाल्यामुळे रस्ते दुरुस्तीसाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तत्कालीन मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे दिनांक १ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (१७-०८-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) पूरहानी दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत रु.३२९.८० लक्ष इतक्या रककमेची कामे मंजूर करण्यात आली असून सदरची कामे सद्यस्थितीत प्रगतीत आहेत.

सन २०२२-२३ मधील अर्थसंकल्पात रु.१९०२.५० लक्ष इतक्या रक्कमेची कामे मंजूर आहेत. सदरची कामे ही अंदाजपत्रक स्तरावर असून कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कामे कार्यन्वीत करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे महानगरपालिकेच्या समान पाणीपुरवठा योजनेच्या प्रकल्प आराखड्यातील अनियमिततेमुळे ५२ कोटी रुपयांचे झालेले आर्थिक नुकसान

(१९) ३५७६६ (१७-०१-२०२२). ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरासाठी राबविण्यात येणाऱ्या समान पाणी पुरवठा योजनेच्या प्रकल्प आराखड्यात झालेल्या अनियमिततेमुळे महानगरपालिकेला ५२ कोटी रुपयांचा आर्थिक भुर्दंड पडला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेच्या जलवाहिन्या टाकण्याच्या कामात ट्रान्स्मिशन लाइनचा समावेश केला नसल्याची बाब प्रकल्पाचे काम सुरु होऊन २ वर्ष झाल्यानंतर निदर्शनास आल्याने झालेल्या अनियमिततेमुळे महानगरपालिकेला ५२ कोटी रुपयांचा आर्थिक भुर्दंड पडला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समान पाणी पुरवठा योजनेच्या ठेकेदाराच्या हितासाठी अधिकारी, सल्लागार आणि ठेकेदाराच्या संगनमताने हा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१५-०९-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) व (३) निविदा क्र.६ मध्ये अस्तित्वातील व नियोजित पाण्याच्या टाक्यांना पाणीपुरवठा करण्यासाठी ट्रान्समिशन लाईन टाकणे या कामाच्या निविदेच्या पूर्वगणनपत्रकामध्ये सल्लागारामार्फत गणकीय चूक झाल्याने ट्रान्समिशन लाईनचे काम पॅकेज-६ च्या कामामधून नियोजित १२० कि.मी. पैकी ९२ कि.मी. पर्यंत काम करणे शक्य होते. उर्वरित २८ कि.मी. लांबीचे काम पूर्ण होणे शक्य नसल्याने उर्वरीत काम पूर्ण करण्यासाठी रु.५२.६८ कोटी रक्कमेची निविदा मागविण्याची कार्यवाही सुरु आहे. सदरची बाब ही कामाच्या सुरुवातीस निदर्शनास आलेली होती. तथापि, सदरचे काम हे ट्रान्समिशन लाईनचे (टाक्यांना पाणीपुरवठा करणारी पाण्याची लाईन) असून सदर पाण्याच्या लाईनचा बराचसा भाग हा खाजगी व शासकीय जागेतून जात असल्याने सदर जागा मालकांना नोटीस देणे व शासकीय परवानग्यांना विलंब होणार असल्याने सदर निविदा विलंबाने मागविण्यात आल्या असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर महानगर पालिका प्रशासनाने नागरिकांकडून वसूल केलेली कराची रक्कम नागरिकांना परत करण्याबाबत

(२०) ३७६८३ (२५-०४-२०२२). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एक राष्ट्र एक कर प्रणाली अंतर्गत वस्तु व सेवा कर कायदा अंमलबजावणी देशामध्ये १ जुलै २०१७ पासून झाल्यानंतर घटनेच्या सातव्या अनुसूचिच्या दोन मधील (राज्य सुची) पूर्वीच्या नोंद ५२ अन्वये आकारण्यात व वसुल करण्यात येणारा प्रवेश कर, जकात कर, स्थानिक संस्था कर, उपकर किंवा इतर कोणताही कर आकारु नये, असे असतांना नागपूर महानगरपालिका प्रशासनाने नागरिकांकडून वरील कराच्या रुपाने रक्कम जमा केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेने कोणत्या अधिनियमांतर्गत नागरिकांकडून कराची रक्कम वसुल केली आहे,
(३) असल्यास, मागील ५ वर्षापासून वसुल केलेल्या कराची रक्कम नागरिकांना परत करण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनीधीनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१५-०९-२०२२) : (१) व (२) हे खरे नाही.
वस्तू व सेवा कर कायदा अंमलबजावणी देशामध्ये दि. ०१ जुलै, २०१७ पासून झाल्यानंतर घटनेच्या सातव्या अनुसूचीच्या दोन मधील (राज्य सुची) पुर्वीच्या नोंद ५२ अन्वये आकारण्यात व वसुल करण्यात येणारा प्रवेश कर, जकात कर, स्थानिक संस्था कर, उपकर किंवा इतर कोणताही कर नागपूर महानगरपालिकेव्दारा आकारण्यात येत नाही.
(३) मा. विधानसभा सदस्य यांनी त्यांचे दि.०५.०७.२०२१ च्या पत्रान्वये कराची रक्कम नागरिकांना सव्याजी परत करण्यासंदर्भात विचारणा केली आहे.
(४) व)५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई आणि नवी मुंबईस जोडणाऱ्या पूलाच्या बांधकामाबाबत

(२१) ३७७३७ (३०-०३-२०२२). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई आणि नवी मुंबईला जोडणाऱ्या दोन खाडी पूल व पूलांची सध्याची क्षमता व मजबूतीकरणाचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पूल सन २०२३ मध्ये पूर्ण करण्याचे नियोजन असल्याने आतापर्यंत किती काम पूर्ण झाले आहे,

(३) असल्यास, सन २०२३ पर्यंत ठाणे खाडी पूल-३ च्या बांधणीचे काम पूर्ण होण्याच्या अनुषंगाने कामाची सद्यःस्थिती काय आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (१५-०९-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकल्पाचे काम करण्यासाठी महामंडळाने मे.एल.अँड टी यांना दिनांक २९.१०.२०२० रोजी कार्यारंभाचे आदेश दिले आहेत. सदर काम ३६ महिन्यांमध्ये म्हणजेच दिनांक २८.१०.२०२३ पर्यंत पूर्ण करणे अपेक्षित आहे. आजपर्यंत प्रकल्पाचे एकुण काम १५% पुर्ण झाले आहे.

(३) सद्यस्थितीत १५% पर्यंत प्रकल्पाचे काम पुर्ण झाले असून उर्वरीत काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रकल्पाचे काम दिनांक २९.१०.२०२० रोजी सुरु झाले कंत्राटदाराने बांधकाम विहित मुदतीत पूर्ण करण्याकरीता आवश्यक यंत्र सामुग्रींचे व्यवस्थापन केले परंतु, कोरोना-१९ या महामारीच्या पहिली व दुसऱ्या लाटेमुळे मजुर व इतर बाबींच्या उपलब्ध न झाल्यामुळे कामाची प्रगती कमी होती. तथापि, उर्वरीत कालावधीत काम पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

अमरावती महानगरपालिकेमध्ये अवैधपणे जाहिरात शुल्क / परवाना फी वसुली करुन केलेला गैरव्यवहार

(२२) ३७९०५ (०९-०४-२०२२). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशामध्ये १ जूलै २०१७ पासुन एक राष्ट्र एक कर प्रणाली अंतर्गत वस्तु व सेवा कर कायदयाची अमलबजावणी झाल्यानंतर संविधानातील जाहिरात कर / परवाना फी लावण्याबाबतची नोंद क्रमांक ५५ वगळण्यात आली तथा मा.न्यायालय, अमरावती यांचे आदेशानुसार जाहिरात फलकावरील कर / परवाना फी वसुल करण्यात येवु नये असे आदेश असतांना अमरावती महानगर पालिका प्रशासनाने जाहिरात एजन्सीकडून दिनाक १ जुलै २०१७ पासून रू.१९,५२,०००/- जाहिरात कर व रू.५३,४४,९७३/- अशी एकुण रू.७२,९६,९७६/- इतकी रक्कम वसुल केल्याचे महानगरपालिका आयुक्तांचे दि. १८ ऑगस्ट, २०२१ च्या पत्रान्वये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असे असतानांही अमरावती महानगरपालिकेमध्ये मे.सेल ॲडस् या कंपनीला जाहिरात शुल्क व परवाना फी वसुलीचे ५ वर्षांकरीता कंत्राट देण्यात आले असून सदर कंपनीने जाहिरात कराची रू.१,१०,६७,५७८/- इतकी रक्कम वसुल करुनही महानगरपालिकेकडे जमा केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर कंपनीविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१५-०९-२०२२) : (१) हे खरे नाही.

मा.दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती यांचे दि.१७.०७.२०१८ रोजीच्या अंतरिम आदेशानंतर जाहिरात शुल्क/ परवाना फी जाहिरात एजंन्सी मे.सेल ॲडस यांच्याकडून वसुल करण्यात आलेला नाही. सदर आदेश निर्गमित होण्यापूर्वी

म्हणजे ०२ ऑगस्ट, २०१७ रोजी दि.११.०२.२०१७ ते १०.०३.२०१७ या कालावधीची व दि.११.०८.२०१६ ते दि.१०.०९.२०१६ या कालावधीची जाहिरात परवाना शुल्क पोटी थकित फरकाची रक्कम रु.१९,५२,०००/- इतका भरणा कंत्राटदार मे. सेल ॲड्स यांच्यामार्फत करण्यात आलेला आहे.

(२) व (३) अमरावती महानगरपालिकेने मे. सेल ॲड्स यांच्या सोबत फक्त जाहिरात कर वसुलीचे कंत्राट दि.११.०२.२०१३ ते दि.१२.०२.२०१८ या पाच वर्षाच्या कार्यकाळ करीता देण्यात आलेले होते. परंतू वस्तु व सेवा कर कायदा लागू झाल्याने सदर कंत्राट मा. स्थायी समिती दि.२९.१२.२०१७ रोजीचा ठराव क्र.१७५ नुसार पुर्वलक्षी प्रभावाने दि.०१.०७.२०१७ पासुन रद्द करण्यात आला आहे. या कंत्राटदाराकडून महानगरपालिकेसोबत झालेल्या करारनाम्याच्या अनुषंगाने मासिक एकमुक्त रक्कम प्राप्त होणे अपेक्षित होते. तसेच कंत्राटदाराने इतर जाहिरातदार कंपन्याकडून किंवा व्यक्तीकडून वसुल केलेल्या रक्कमेचा गोषवारा करारनाम्या नुसार महानगरपालिकेस कंत्राटदारने सादर करणे अपेक्षीत नसल्याने सदरहू माहिती महानगरपालिकेकडे उपलब्ध नाही असे आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर महानगरपालिकेतील विकास कामे सुरु करण्याबाबत

(२३) ३७९०९ (२०-०४-२०२२). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेतील स्टेशनरी गैरव्यवहारामुळे वित्त व लेखा विभागातील कामकाज ठप्प असल्याने शहरातील विकास कामे प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे ३१ डिसेंबर २०२१ पर्यंत शहरातील रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी कामे सुरु केली जाणार होती मात्र अद्याप कार्यदेशाची प्रक्रिया पूर्ण न झाल्याने शहरातील विकास कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर महानगरपालिकेतील आगामी निवडणूक लक्षात घेता विकास कामे सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१५-०९-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) व (३) नागपूर महानगरपालिकेचे हॉट मिक्स प्लाँटव्दारा महानगरपालिका सिमेतंर्गतील रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याकरीता देखभाल व दुरुस्तीच्या अनुषंगाने दि. ३१.०३.२०२२ पर्यंत ६९८३ खड्ड्यांची (१,१०,२४६.२५ चौ.मी.) दुरुस्ती करण्यात आलेली असून, सन २०२२-२३ मध्ये दि. १७.०६.२०२२ पर्यंत एकूण ७७३ खड्ड्यांची (१३९०९.७५ चौ.मी.) दुरुस्ती झालेली आहे. देखभाल व दुरुस्तीची कामे नियमितपणे सुरु आहेत.

शहरातील नविन रस्ते निर्माण खडीकरण, डांबरीकरण, विस्तारीकरण, सिमेंट काँक्रिट रस्त्यांची दुरुस्ती, रस्ते विकास कार्यक्रम, इतर मुख्य रस्त्याची सुस्थिती व दुरुस्ती इत्यादी करिता सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात रु. ६९३०.२१ लक्ष रकमेचे कार्यादेश निर्गमित करण्यात आले असून, कामे प्रगतीपथावर आहे. याशिवाय सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षात उपलब्ध तरतूदी नुसार नियोजन करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील सर्व महानगरपालिका क्षेत्रात फेरीवाला धोरण राबवून स्थानिकांना प्राधान्य देण्याबाबत

(२४) ३७९२६ (१८-०४-२०२२). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रात दोन वर्षापूर्वी सोडतीद्वारे राबविण्यात आलेली प्रक्रिया अद्याप अपूर्ण असल्याने फेरीवाले आपल्या हक्काच्या जागेपासून वंचित असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील एल्फिन्स्टन पुलाच्या दुर्घटनेनंतर तसेच मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मुंबई एमएमआरडीए क्षेत्रातील कल्याण, डोंबिवली, ठाणे, दादर, कुर्ला, अंधेरी, बोरीवली आणि परिसरातील रेल्वे स्थानकापासून १५० मीटर हद्दीत फेरीवाल्यांना मज्जाव करण्यात आला आहे, हे ही खरे काय,

(३) असल्यास, राज्यातील सर्व महानगरपालिका क्षेत्रात फेरीवाला धोरण राबवून स्थानिकांना प्राधान्य देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय ?

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-०९-२०२२) : (१) दिनांक १३.११.२०१९ रोजी कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रात जागा वाटपासंबंधी सोडत काढून जागा निश्चित करण्यात आल्या होत्या. तथापि प्रस्तावित जागा निवासी क्षेत्रात असल्याने अन्यत्र ठिकाणी जागा देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केली असून, सोडत काढतेवेळी निश्चित करण्यात आलेले क्षेत्रफळ फेरीवाल्यांना मान्य नाही असे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) पथविक्रेता धोरणाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयामध्ये दाखल रिट याचिका क्र. ६५२/२०१७ व ६७२८/२०२१ मध्ये मा. उच्च न्यायालयाने अनुक्रमे दिनांक ०१.११.२०१७ व दिनांक २२.०६.२०२२ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने पथविक्रेता योजना तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई शहर व उपनगरातील २४ प्रभाग वाढवून २७ करण्याचा घेतलेला निर्णय

(२५) ३८०३० (३१-०३-२०२२). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरातील २४ प्रभाग वाढवून २७ करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेने प्रभाग विभाजनाचा प्रस्ताव अंतिम मंजूरीसाठी राज्य शासनाकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील २४ प्रभागांची संख्या वाढवून २७ करण्याची कारणे काय आहेत व उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-०९-२०२२) : (१) मुंबई शहर व उपनगरातील एकूण २४ विभागांचे २६ विभाग करण्याचा निर्णय बृहन्मुंबई महानगरपालिकेने घेतला आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विभाग विभाजनाच्या प्रस्तावास महानगरपालिकेकडून अंतिम मंजुरी दिली जाते.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पी/उत्तर, के/पूर्व व एल विभागांची अनुक्रमे ९.५९ लाख, ८.२३ लाख व ८.९९ लाख अशी एकूण लोकसंख्या पाहता, सदर विभागांमधे कार्यरत यंत्रणा अपुरी पडत आहे. त्यामुळे सदर विभागांतील नागरिकांना विविध सेवा सुविधा देण्यासाठी गतिमानता येत नाही.

यास्तव, प्रशासकीय गतिमान्यतेसाठी “पी/उत्तर” विभागाचे “पी/पूर्व” विभाग व “पी/पश्चिम” विभाग, तसेच, “के/पूर्व” विभागाचे “के/दक्षिण” व “के/उत्तर” असे विभाजन करण्यास अनुक्रमे दिनांक २७.०१.२०२२ व दिनांक १०.०५.२०२२ रोजीच्या ठरावान्वये मंजुरी प्राप्त झाली आहे.

त्याअनुषंगाने पी/उत्तर व के/पूर्व विभागाच्या विभाजनानंतर निर्माण होणाऱ्या पी/पूर्व व के/उत्तर या नवीन विभाग कार्यालयांच्या इमारतींसाठी जागेची निश्चिती करणे, नवीन आस्थापनीय पदे निर्माण करणे, अर्थसंकल्पीय तरतूद करणे, फर्निचर, स्टेशनरी इ. उपलब्ध करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

तसेच, “एल” विभागाचे “एल/दक्षिण” व “एल/उत्तर” असे विभाजन करण्याची प्रशासकीय कार्यवाही सुरु आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

वाठोडा स्थित (जि.नागपूर) येथील चांदमारीतील एनआयटीच्या जमिनीची विक्री करून भूमाफियांनी केलेली फसवणूक

(२६) ३८३२३ (१८-०४-२०२२). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाठोडा स्थित (जि.नागपूर) येथील चांदमारीतील एनआयटीच्या सुमारे १९.१० एकर जमीनिची विक्री करून तब्बल ७१ कोटी रुपयांची भूमाफियांनी फसवणूक केल्याची घटना दिनांक १५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि तदनुषंगाने उक्त प्रकरणात सहभागी असलेल्या तसेच फसवणूक करणाऱ्या भूमाफिया व अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कठोर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१६-०९-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) होय.

(३) मौजा-वाठोडा, खसरा क्रमांक १५७ येथील आराजी १९.१० एकर ही जागा नागपूर सुधार प्रन्यास द्वारे ड्रेनेज ॲण्ड डिस्पोजल स्किम करीता सन १९५३ ला अधिग्रहित करण्यात आली होती. तद्नंतर नागपूर सुधार प्रन्यास व्दारे १९.०२.१९६९ ते ३१.०३.१९९९ पर्यंत श्री. महिपंत शेन्द्रे व इतर तीन यांना खसरा क्रमांक १५७ आराजी १९.१० एकर ही जागा शेती वापराकरीता भाडेपट्ट्यावर अटी व शर्ती लागु करुन वाटप करण्यात आली होती. तद्नंतर भाडेपट्टेधारकांच्या विनंती च्या अनुषंगाने नागपूर सुधार प्रन्यास व्दारे दि.०१.०४.१९९९ ते ३१.०३.२०२९ पर्यंत शेती वापरासाठी भाडेपट्टा नुतनिकरण करण्यात आले. भाडेपट्टेधारकांनी उक्त जागेवर भुखंड पाडून विक्री करत असल्याबाबत सन २०२१ मध्ये निदर्शनास आले.

संबंधित भूमाफियाविरुद्ध वाठोडा पोलिस स्टेशन येथे गुन्हा क्र. २०, दि.१३.०१.२०२२ रोजी दाखल केलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईत अवैध पाणी उपसा, पाणी चोरी, टँकर माफियांच्या माध्यमातून मोठया प्रमाणात गैरप्रकार होत असल्याबाबत

(२७) ३८३९२ (२५-०४-२०२२). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत अवैध पाणी उपसा, पाणी चोरी, टँकर माफियांच्या माध्यमातून मुंबई आणि मुंबई महानगर क्षेत्रात तब्बल ३

हजार कोटींची उलाढाल होत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्रिय भुजल विभागाच्या सर्वेक्षणानूसार मुंबई शहरात १९ हजार पेक्षा जास्त पाण्याच्या विहिरी असून ज्यापैकी १२ हजार ५०० बोरवेल, २५१ जलकुंभ, २१६ जलविहिरी असून यातील एकाच जलकुंभातून ८० कोटी रुपयांची पाणीचोरी झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईतील बेकायदेशीर व अनियंत्रित पाणी चोरीचा तपास करुन त्यांना दंड आकारुन ही चोरी थांबविण्यासाठी शासन काही ठोस पावले उचलणार आहे काय,
(४) असल्यास, मुंबईच्या विद्यमान भुजल संसाधनाच्या वापराची क्षमता लक्षात घेऊन वैज्ञानिकदृष्टया अभ्यास करुन पाणी वापराचे धोरण निर्धारित करण्यासाठी शासनाने तज्ञ समितीची नेमणूक करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-०९-२०२२) : (१) अशा आशयाची कोणतीही माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झालेली नाही.
(२) केंद्रीय भूजल विभागाने मुंबई शहरात विहिरींचे सर्वेक्षण केल्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे माहिती उपलब्ध नाही.

तथापि सन २०२१ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेल्या सर्वेक्षणानुसार एकूण ४७१० विहिरी आढळून आल्या आहेत. तसेच, माहे डिसेंबर, २०२१ पर्यंत एकूण १२,९५४ कुपनलिकांना व १७४७ कंगण विहिरींना महानगरपालिकेमार्फत परवानगी देण्यात आली आहे.

तसेच, मुंबईत एकाच विहिरीतून ८० कोटी रुपयांची पाणी चोरी झाल्याची तक्रार पोलीसांकडे दाखल झाली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेच्या जलवाहिन्यांमधून अनधिकृत जलजोडणी घेऊन पाणी चोरी होत असल्यास अशा जलजोडण्या त्वरीत खंडीत करण्यात येतात. तसेच विभाग स्तरावर वेळोवेळी अनधिकृत जलजोडण्या शोधून त्या खंडीत करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मोहिम राबविण्यात येते. त्यानुसार सन २०१९ मध्ये ४११६, सन २०२० मध्ये २८०८ व सन २०२१ मध्ये ३१०९ जलजोडण्या खंडीत करण्यात आल्या आहेत.

तसेच काही अनधिकृत जलजोडणीधारकांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यास सदर जलजोडण्या नियमित करण्यात येतात.

झोपडपट्टी रहिवाशांना जलजोडणी घेणेकरिता माहे जानेवारी, २०१७ पासून बृहन्मुंबई महानगरपालिकेने नवीन धोरण अंमलात आणले आहे. सदर धोरणांतर्गत जलजोडणी घेण्याकरिता आवश्यक कागदपत्रांच्या पूर्ततेत सुसूत्रता / सुटसुटीतपणा आणला आहे. त्यामुळे बरेच झोपडपट्टीधारक पात्र असल्याने स्वतंत्र जलजोडणी घेण्याकडे कल वाढला आहे.

या सर्व उपाययोजनांमुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जलवाहिन्यांतून होणाऱ्या पाणी चोरीचे प्रमाण कमी झाले आहे असे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) मुंबईच्या विद्यमान भुजल संसाधनाच्या वापराची क्षमता लक्षात घेऊन वैज्ञानिकदृष्टया अभ्यास करुन पाणी वापराचे धोरण निर्धारित करण्याच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्याची विनंती पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर येथील शासकीय व निमशासकीय कार्यालयांतील व विश्रामगृहातील अग्निसुरक्षा यंत्रणा बंद स्थितीत असल्याबाबत

(२८) ३९४३८ (१९-०४-२०२२). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने अतिमहत्वाच्या शासकीय कार्यालये यासह शहरातील २८ शासकीय इमारती व विश्रामगृहातील अग्निसुरक्षा यंत्रणेची माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान तपासणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तपासणीत सदरील कार्यालये व विश्रामगृहातील अग्निसुरक्षा यंत्रणा बंद स्थितीत असल्याचे निदर्शनास आले आहे व त्यामुळे येथे अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने माहिती घेऊन सदरील ठिकाणची अग्निशमन यंत्रणेची तातडीने दुरुस्ती करुन ती कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१२-०९-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) व (३) बहुतांश शासकीय व निम शासकीय कार्यालय व विश्रामगृह इमारती महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अस्तित्वात येण्यापूर्वीच निर्माण झालेल्या आहेत. अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागामार्फत फायर ऑडीट केलेल्या या सर्व इमारतीमध्ये प्राथमिक अग्निशमन उपाययोजना प्रस्थापित असून बहुतांश इमारतीमध्ये कार्यान्वित आहे.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक अधिनियम २००६ च्या तरतुदी नुसार किमान आवश्यक असलेल्या अग्निशमन उपाययोजनाच्या अपर्याप्ततेसंबंधी संबंधीतांना नोटिस देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर शहरातील मालकी हक्कांच्या पट्टयांचे प्रलंबीत प्रस्तावांबाबत

(२९) ३९५६४ (१८-०४-२०२२). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील विविध भागातील शासकीय व नझूल जमिनीवरील झोपडपट्टी वसाहतींमधील १४ हजारांपेक्षा जास्त मालकी हक्क पट्टयांचे प्रस्ताव नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयातील नझूल कार्यालयामध्ये मागील २ वर्षांपासुन प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत किती प्रस्तावांना मंजुरी प्रदान करण्यात आली असून, उर्वरित प्रस्ताव मंजुरी बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१५-०९-२०२२) : (१) व (२) नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडून २५ झोपडपट्टयांचे एकूण ४१७३ अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाले होते. त्यापैकी जिल्हास्तरीय समितीने एकूण २९२२ प्रकरणे पात्र केली. एकूण ४३२ भाडेपट्टे अर्जदारांना वाटप करण्यात आले होते. तथापि मार्च २०२० पासून कोव्हीड साथरोगाचा प्रादुर्भाव पसरल्याने सुमारे दीड ते दोन वर्षापर्यंत पट्टेवाटपाची कार्यवाही करता आली नाही. शासन निर्णय दि.१७.११.२०१८ व शुध्दीपत्र दि.२६.०२.२०१९ नुसार महानगरपालिका यांचेकडून प्राप्त PTS नकाशा, नगर भूमापन अधिकारी, नागपूर यांचेकडील नगर भूमापन नकाशावर अद्यारोपित केल्यानंतर ८ झोपडपट्टीमधील ६९३ प्रकरणाला समितीच्या पुनर्निर्णय सभेत मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेसाठी बसणाऱ्या
विद्यार्थ्यांच्या संख्येत घट झाल्याबाबत

(३०) ४०३८३ (१९-०४-२०२२). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेंसाठी बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मागील दहा वर्षात (सन २०१० ते २०२०) सुमारे ५ लाख वरून २६ लाख इतकी झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने वाढते परीक्षार्थी संख्या लक्षात घेता आयोगाच्या अधिकारी / कर्मचारी यांचे संख्येत वाढ करण्याऐवजी घट केल्याने आयोगास मनुष्यबळाचा तुटवडा निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आयोगाकडे कमी मनुष्यबळ असल्याने स्पर्धा परीक्षा घेण्याचा ताण आयोगावर आल्याने परीक्षा व्यवस्थापनाचे नियोजन कोलमडले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्पर्धा परीक्षेचा आयोगावरील ताण कमी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०८-०९-२०२२) : (१) हे खरे नाही.

विविध भरती प्रक्रीयांमध्ये अर्ज करणाऱ्या उमेदवारांची महत्तम संख्या २०१७ मध्ये दिसून आली ती १७,३५,२९० इतकी होती.

(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या आकृतिबंधातील पदसंख्येत कोणतीही घट केलेली नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे अजंग-कासविहीर (ता.जि.धुळे) येथील शेतकऱ्यांना जाण्या-येण्यासाठी
रस्ता नसल्याने भुयारी मार्गास मंजूरी देण्याबाबत

(३१) ४०४६४ (१८-०४-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ चे चौपदरीकरणाचे काम सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय महामार्ग क्र.६ वरील मौजे अजंग-कासविहीर (ता.जि.धुळे) येथील शेतकऱ्यांना जाण्या-येण्यासाठी रस्ता नसल्याने येथे भुयारी मार्ग मंजूर करण्यात यावे, अशी मागणी स्थानिक शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणी लक्षात घेता शासनाने भुयारी मार्गास मंजुरी देण्याबात कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (११-१०-२०२२) : (१) होय.

(२) होय.

(३) धुळे जिल्हयातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र.६ चे चौपदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या अखत्यारीत असून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे. त्याअनुषंगाने प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, जळगांव यांनी कळविल्यानुसार सदर मागणी अर्ज स्वतंत्र तांत्रीक सल्लागार यांना पाठविण्यात आला असता त्यांनी खालीलप्रमाणे माहिती सादर केली आहे.

१. साखळी क्र.५०९.५५५ येथे पादचारी अंडरपास (PUP) मागणी केली आहे, परंतू बांधकाम करारानुसार साखळी क्र.५०९.६३८ अजंग गावाजवळ हलके वाहन अंडरपास (LVUP) प्रस्तावित आहे आणि काम प्रगतीपथावर आहे.
२. मागणी केलेल्या पादचारी अंडरपास (PUP) आणि प्रस्तावित हलके वाहन अंडरपास (LVUP) दरम्यान फक्त १०० मी. चे अंतर आहे व तेथे रॅम्प साखळी कि.मी.५०९.२५० ला सुरु होऊन कि.मी. ५१०.००० ला संपतो. गावकऱ्यांना सुरक्षेच्या दृष्टीने महामार्ग ओलांडण्यासाठी तेथे दोन्ही बाजुला सेवा रस्ता (Service Road) दिला आहे.
३. सवलत करारनाम्यानुसार ५०७.८०० कि.मी. या ठिकाणी पादचारी अंडरपास प्रस्तावित नाही.
४. मागणी केलेल्या ५०७.८०० काशविहीर या गावाजवळ प्रत्यक्ष जागेवर निरीक्षण केले असता गावाच्या कमी लोकसंख्येच्या मानकानुसार साखळी ५०७.८५० कि.मी. येथे मेडियन ओपनींग (Median Opening) प्रस्तावित केलेला आहे व तो गावाची लोकसंख्येनुसार पुरेसा आहे.
५. स्वतंत्र तांत्रीक सल्लागार मेसर्स आरवी असोसिएट्स यांनी दिलेल्या सल्ल्यानुसार साखळी ५०९.६३८ कि.मी. अजंग गावाजवळ हलके वाहन अंडरपास (LVUP) प्रस्तावीत आहे आणि काम सुध्दा प्रगतीपथावर आहे तसेच साखळी ५०७.८५० कि.मी. ला मेडियन ओपनींग दिलेला आहे.

तसेच आयआरसी मानकानुसार वाहन अंडरपास/ओव्हरपास/हलक्या वाहनांच्या अंडरपास (VUP/LVUP) पासून २ कि.मी.च्या अंतरावर पादचारी अंडरपास/पादचारी पूल (PUP/FOB/CUP) आवश्यक नाही.
(४) प्रश्न उद्धवत नाही.

पुणे शहरात अग्निशमन केंद्रांची संख्या वाढविण्याबाबत

(३२) ४०७८३ (२०-०४-२०२२). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेत समाविष्ट ३४ गावांसह ७६ अग्निशमन केंद्रांची आवश्यकता असताना सद्य:स्थितीत केवळ १४ अग्निशमन केंद्रांवर शहराच्या अग्निसुरक्षेची जबाबदारी असल्याची बाब दिनांक १८ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अपुऱ्या अग्निशमन केंद्रांवरील अपुरे मनुष्यबळ, अग्निशमन दलात सन २०११-१२ पासून कर्मचाऱ्यांची भरती न होणे, दहा किलोमीटरच्या परिघात एकही अग्निशमन केंद्र नसणे अशा बाबी निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन पुणे शहरात अग्निशमन केंद्राची संख्या वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०५-०९-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.

पुणे महानगरपालिका परिक्षेत्रासाठी समाविष्ट ३४ गावांसह हद्दवाढीमुळे झालेल्या ५१८ चौ. किलोमीटर क्षेत्रासाठी किमान ७२ अग्निशमन केंद्रांची आवश्यकता आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.

पुणे महानगरपालिका अग्निशमन सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२२, दि. ०७ जून, २०२२ अन्वये मंजूर केलेले आहेत. त्यानुसार भरती प्रक्रिया राबविण्याबाबतची कार्यवाही पुणे महानगरपालिकेकडून करण्यात येणार आहे.
(३) पुणे महानगरपालिका परिक्षेत्रामध्ये एकूण १४ अग्निशमन केंद्रे कार्यरत असून ०५ अग्निशमन केंद्रांचे बांधकाम पुर्णत्वास आले आहे. ०३ अग्निशमन केंद्रांचे बांधकाम सुरु आहे. पुणे महानगरपालिका परिक्षेत्रातील वाढीव हद्दीमध्ये उभारण्याच्या अग्निशमन केंद्रांसाठी तरतूद उपलब्ध करुन घेण्याची प्रक्रिया सुरु असून याबाबत योग्य ती पुढील कार्यवाही करण्यात येत आहे, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्धवत नाही.

राज्यात वक्फ बोर्डाच्या जागेवर झालेले अतिक्रमण दुर करण्याबाबत

(३३) ४०९४७ (०९-०४-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वक्फ बोर्डाच्या जागेवर झालेले अतिक्रमण दुर करुन सदरहू जागा मुस्लिम समाजाच्या उद्धारासाठी देणार असल्याची माहिती महाराष्ट्राच्या वक्फ बोर्डाच्या अध्यक्षांनी दिली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्याच्या वक्फ बोर्डाकडे असलेली हजारो हेक्टर जमीनीवर बेकायदेशीररित्या अतिक्रमण झाले असून लोकांच्या ताब्यात आहे त्यांच्या ताब्यातील जमीन कायदेशीररित्या काढून मुस्लिम समाजाच्या उद्धारासाठी तिचा वापर करण्याचा मानस वक्फ बोर्डाचा आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (०८-०९-२०२२) : (१) अशंत: खरे आहे. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांनी एका कार्यक्रमात बोलतांना वक्फ मालत्तेवर झालेली अतिक्रमणे हटविल्यानंतर सदर वक्फ जमिनी शैक्षणिक व सामाजिक उपक्रमासाठी उपलब्ध करुन देण्यात येतील अशा अर्थाचे वृत्त माहे जानेवारी, २०२२ मध्ये एका वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द झालेले आहे.
(२) व (३) वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३(r) नुसार वक्फ या शब्दाची व्याख्या करण्यात आली असून एखाद्या व्यक्तीने कोणतीही चल, अचल मालमत्ता मुस्लीम कायद्याप्रमाणे धार्मिक, धर्मादाय प्रयोजनासाठी कायमस्वरुपी दान करणे. वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ५४ नुसार राज्यातील वक्फ मालमत्तेवरील अतिक्रमणे काढण्याबाबत वक्फ मंडळाकडून कार्यवाही करण्यात येत आहे. भाडेपट्टा नियम, २०१४ तसेच वक्फ अधिनियम,१९९५ च्या कलम ५६ आणि ३२(२)(j) अन्वये वक्फ मालमत्ता भाडेपट्ट्यावर देण्याबाबत तरतूदी विहित करण्यात आलेल्या आहेत. वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम, २०१४ च्या कलम (१७) नुसार ३० वर्षांच्या भाडेपट्ट्यास मान्यता देण्याचा अधिकार शासनास आहे. उपरोक्त तरतूदीनुसार खालील प्रयोजनासाठी वक्फ मालमत्ता भाडेपट्ट्यावर देता येते :-

अ.क्र	भाडेपट्टा प्रयोजन	भाडेपट्टा कालावधी
१	दुकान	५ वर्ष
२	शीतगृह, मंगल कार्यालय (शादीखान), लघु उद्योग	१० वर्ष
३	शॉपीग मॉल, रहिवासी इमारत, हॉटेल, रेस्टॉरंट, सराय	३० वर्ष
४	शैक्षणिक संस्था, महाविद्यालय, विद्यापीठ, इस्पीतळ, दवाखाना, मदरसा किंवा मकतब	३० वर्ष
५	कृषि	३० वर्ष

राज्यातील वक्फ जमीनीवरील अतिक्रमण हटविल्यानंतर वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ५६ आणि ३२(२)(j) तसेच वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम, २०१४ पुढील कार्यवाही करणे शक्य होणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

बीड जिल्ह्यात वक्फ बोर्डाच्या जमिनीचे बेकायदेशीर हस्तांतरण केल्याबाबत

(३४) ४०९५९ (०९-०४-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात वक्फ बोर्डाच्या जमिनीचे बेकायदेशीर हस्तांतरण झाल्या प्रकरणाची सुनावणी अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांनी घेतल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपर जिल्हाधिकारी, अंबाजोबाई यांनी पाठविलेल्या अहवालास धारुर येथील ५५६, ६१०, ३५९, ५५१, ३६३ या पाच सर्वेमधील जमिनीचे बेकायदा हस्तांतरण केल्याचा अभिप्राय नोंदविला आहे हे ही खरे काय,
(३) असल्यास, मा.न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन आणि अपर जिल्हाधिकारी यांनी नोंदवलेल्या अभिप्रायानुसार शासनाने संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०८-०९-२०२२) : (१) होय.
(२) अशंत: खरे आहे. मस्जीद समस्त, बीड शी संबंधित मौजे धारुर येथील सर्वे नं.५५६ व ६१० या दोन सर्वेमधील एकूण ४५ एकर १२ गुंठे जमीन बेकायदा हस्तांतरण केल्याचे अभिप्राय अप्पर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांनी त्यांच्या दि.४.०८.२०२१ च्या आदेशान्वये नोंदविले आहेत.
(३) अप्पर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांनी त्यांच्या दि.४.०८.२०२१ च्या आदेशान्वये नोंदविलेल्या अभिप्रायाविरुध्द मस्जीद समस्त, बीड या इनाम जमीनीच्या इनामदारांनी अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे अपील दाखल केले आहे. सदर अपीलाविरुध्द महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाने अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे आपले म्हणणे सादर केले असून सद्य:स्थितीत सदर प्रकरण अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे सुनावणीसाठी प्रलंबित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पालघर जिल्ह्यातील केळवे रोड येथील पूर्व-पश्चिम भाग जोडण्याकरीता उड्डाण पूल बांधण्याबाबत

(३५) ४०९६६ (१९-०४-२०२२). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विनोद निकोले (डहाणू) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील केळवे रोड येथील पूर्व-पश्चिम भाग जोडण्याकरीता उड्डाणपूल बांधण्यासाठी केळवे रोड परिसर कृती समितीने दिनांक २२ ते २६ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास केळवे ग्रामपंचायती समोर धरणे आंदोलन केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कृती समितीने मा.पालकमंत्री यांना देखील लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय;
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, सदर चौकशीअंती केळवे रोड येथील पूर्व-पश्चिम भाग जोडण्याकरीता उड्डाणपूल बांधण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (१९-०९-२०२२) : (१) व (२) दि.१६.०९.२०१९ रोजी केळवारोड पूर्व रस्ता कमिटीने जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडे निवेदन दिले आहे. तथापि ग्रामपंचायतीसमोर धरणे आंदोलन केले असल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(३) व (४) पालघर जिल्ह्यातील केळवे रोड पूर्व-पश्चिम भाग जोडण्याकरीता बांधकाम मागणी केलेला उड्डाणपूल सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील रस्त्यांवर नाही. तथापि, जिल्हाधिकारी पालघर यांच्या मागणीनुसार प्रस्तावित रेल्वे उड्डाणपुलाचे ढोबळ अंदाजपत्रक जिल्हाधिकारी, पालघर यांना दि.१७/१२/२०१९ रोजी सादर केले आहे.

राजापेठ उड्डाणपूल (जि.अमरावती) येथे राजे शिवछत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा स्थापित करण्याबाबत

(३६) ४११२५ (२५-०४-२०२२). श्री.रवि राणा (बडनेरा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापेठ उड्डाणपूल (जि.अमरावती) येथे राष्ट्रमाता आई जिजाऊ यांच्या जयंतीच्या पावन पर्वावर दिनांक १२ जानेवारी, २०२१ रोजी हिंदुत्ववाद्यांचे आराध्य दैवत राजे शिवछत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा स्थापित करण्यात आला असून, सदर पुतळा अमरावती मनपा प्रशासन व पोलीस विभाग यांनी दिनांक १६ जानेवारी, २०२२ रोजी मनपाच्या अतिक्रमण विभागातील गोदामात ठेवण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पुतळा आवश्यक त्या परवानग्यासह दिनांक १८ फेब्रुवारी, २०२२ रोजीपुर्वी सन्मानीत पुर्नस्थापित करण्यात यावा तसेच दर्यापुर येथे छत्रपती शिवाजी महाराज, अमरावती शहरामध्ये लोकशाहीर साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा पुर्नस्थापित करण्याची मागणी अमरावती जिल्ह्यातील शिवप्रेमी, नागरिक तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना केली असून, त्यासंदर्भातील मागणी मान्य करण्याकरीता पत्रक क्रमांक २७/गृह विभाग/२०५/२०२२ दिनांक २७ जानेवारी, २०२२ रोजीचा प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने दिनांक १९ फेब्रुवारी, २०२२ रोजी असणाऱ्या शिवयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविण्याबाबत शासन जिल्हा प्रशासनाला आदेश देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१६-०९-२०२२) : (१) हे खरे आहे.

सदर अनधिकृतपणे बसविण्यात आलेला पुतळा पोलीस प्रशासन व महानगरपालिका प्रशासन यांचे संयुक्तीक कार्यवाहीने काढून भांडार विभागाच्या गोदामात सुरक्षितरित्या पूर्ण सन्मानाने ठेवण्यात आला आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

याअनुषंगाने जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडून अहवाल प्राप्त करण्याची कार्यवाही विभागाच्या स्तरावरुन सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

जोडमोहा (ता.कळंब जि. यवतमाळ) येथील रस्त्याच्या दुरवस्थेबाबत

(३७) ४१३४९ (१९-०४-२०२२). डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोडमोहा (ता.कळंब जि.यवतमाळ) येथील जोडमोहा ते कळंब हा रस्ता अरूंद असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून सदरील रस्त्याची फक्त डागडूजी केली जाऊन मागील बऱ्याच वर्षापासून रस्त्याचे बांधकाम करण्यासाठी निधी उपलब्ध झाला नसल्याचे दिनांक २० जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यावर १० ते १५ खेडी गावे असून तालुक्याच्या ठिकाणी नियमित वाहतूक होत आहे, त्यामुळे रस्ता हा अरूंद व लहानपुलामुळे येथे अपघात होत असून गत वर्षी एकाच कुटूबांतील ५ नागरीक मुत्यूमुखी पडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे?

श्री. रविंद्र चव्हाण (१६-०९-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) व (३) अपघातस्थळी पोलीस विभागासह चौकशी केली असता, दि.१६.०२.२०२० रोजी वाहन चालकाने क्षमतेपेक्षा जास्त अवैध प्रवासी घेऊन भरधाव वेगाने वाहन चालविल्यामुळे अपघात झाल्याचे आढळून आले आहे.
(४) प्रश्नाधीन रस्त्याच्या कामाबाबत निकष, मंजुरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून काम हाती घेण्याचे नियोजन राहील.

नवी पेठ (जि.पुणे) येथील वैकुंठ स्मशानभूमीची दुरुस्ती करण्याबाबत

(३८) ४१५२६ (२५-०४-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील महानगरपालिकेची नवी पेठेतील मोठी वैकुंठ स्मशानभूमीत विद्युत बंद पडलेली शवदाहिनी, तुंबलेली ड्रेनेजची पाईपलाईन, सर्वत्र पडलेला राडारोडा, अस्वच्छता यामुळे अंत्यविधीसाठी आलेल्या नातेवाईकांना त्रास सहन करत विधी पूर्ण करावा लागत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने वैकुंठ स्मशानभूमीची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१५-०९-२०२२) : (१) हे खरे नाही.
वैकुंठ स्मशानभूमीची एकूण ३ विद्युत दाहिनी व १ गॅस शवदाहिनी असून आजमितीस सर्व दाहिन्या कार्यरत आहेत.
सदर स्मशानभूमीत कायम स्वरुपी स्वच्छता राखली जाते, तुंबलेली ड्रेनेज साफसफाईची कामे क्षेत्रिय कार्यालयामार्फत चालू असतात तसेच त्या ठिकाणी विविध विकास कामे केली जात असल्याने या विकास कामातील राडारोडा संबंधित ठेकेदाराकडून काढून घेण्यात आला असून तेथे स्वच्छता करण्यात आली आहे.
(२) वैकुंठ स्मशानभूमीतील विद्युत व गॅस दाहिन्यांचा वापर सतत असून देखभाल व दुरुस्ती नियमितपणे करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहरातील पीएमपीएमएल बस थांब्याची झालेली दुरवस्था

(३९) ४१५२९ (३१-०३-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील पीएमपीएमएल बस थांब्याची दुरवस्था झाल्याने प्रवाशांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुषंगाने सदरहू पीएमपीएमएल बस थांब्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१५-०९-२०२२) : (१) होय.
(२) व (३) पुणे महानगर परिवहन महामंडळ लि., मार्फत याबाबत वेळोवेळी पाहणी करण्यात येते. तसेच महामंडळामार्फत ताब्यातील बसशेडची दुरुस्ती कामे करण्यासाठी वार्षिक स्वरुपात टेंडर काढण्यात येऊन त्याद्वारे दुरुस्तीची कामे करण्यात येत असल्याचे पुणे महानगर परिवहन महामंडळ लि., यांनी कळविले आहे.

रा.नगर पट्टी कॉनेर (ता.जि.धुळे) येथील नगरपरिषदेच्या मालकीच्या (व खाजगी जागेमध्ये) अतिक्रमण करुन रस्ता बंद केल्याबाबत

(४०) ४१६८० (२५-०४-२०२२). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रा.नगर पट्टी कॉनेर (ता.जि.धुळे) येथील श्री. राजन विष्णु चौक यांच्या जागेमध्ये राजेंद्र रमेशचंद्र साळुंके व इतर यांनी नगरपरिषदेच्या मालकीच्या (व खाजगी जागेमध्ये) अतिक्रमण करुन रस्ता बंद केल्यामुळे यावर तात्काळ स्थगिती सुनावणी होणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.नगरविकास मंत्री यांच्याकडे दिनांक १६ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१३-०९-२०२२) : (१) होय,

श्री. राजन विष्णु चौक राहणार नगरपट्टी कॉर्नर धुळे (ता. जि. धुळे) यांच्या जागेमध्ये राजेंद्र रमेशचंद्र साळुंके व इतर यांनी नगरपरीषदेच्या मालकीच्या (व खाजगी जागेमध्ये) अतिक्रमण करुन रस्ता बंद केल्यामुळे यावर तात्काळ स्थगिती सुनावणी होणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दि.१६ डिसेंबर २०२० रोजी मा. नगरविकास मंत्री यांच्याकडे लेखी निवेदन दिले आहे.

(२) सदर निवेदनावर शासनाने दि.१८/०१/२०२१ रोजीच्या स्वतंत्र पत्रान्वये आयुक्त धुळे महानगरपालिका व संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून अहवाल अपेक्षिलेला होता त्यावर धुळे महानगरपालिकेने दि.१९/०४/२०२१ रोजीच्या पत्रान्वये व संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि.१७/०८/२०२१ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने वस्तुस्थितीदर्शक अहवाल योग्य त्या निर्णयार्थ शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे.

(३) लागू नाही.

वाघोली या गावाचा पुणे महानगरपालिकेमध्ये नव्याने समावेश झालेला असल्याने या गावांच्या सर्वांगीण विकासाकरिता सोईसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

(४१) ४२१२७ (२५-०४-२०२२). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेमध्ये वाघोली या गावाचा नव्याने समावेश झालेला असून या गावाची लोकसंख्या सुमारे २ लाखांपर्यंत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वाघोली गावातून शासनास मोठया प्रमाणावर महसूल कर मिळत असल्याने त्या पध्दतीने नागरिकांना सोईसुविधा मिळणेबाबत मागणी होत आहे, हे ही खरे आहे,

(३) असल्यास, वाघोली गावाची लोकसंख्या मोठी असल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, सांडपाणी, घनकचरा व्यवस्थापन, आरोग्य सुविधा, रस्ते विकास इत्यादी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण यांच्याकडून सदरची कामे होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१५-०९-२०२२) : (१) होय.

(२) होय.

(३) वाघोली या गावाचा पुणे महानगरपालिकेमध्ये समावेश होण्यापूर्वी प्राधिकरणामार्फत खालील नमूद कामे करण्यात आलेली/प्रगतीपथावर असल्याचे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी कळविले आहे.

- वाघोली ग्रामपंचायतीस घनकचरा व्यवस्थापन करणेकरिता १५ घंटागाड्या पुरविण्यात आल्या आहेत.
- वाढीव वाघोली पाणी पुरवठा योजनेचे काम (क्षमता ५.०० द.ल.लि.) प्रगती पथावर आहे.

- पुणे-नगर महामार्गावरील वाघोली गावातील १३०० मी. लांबीच्या महामार्गाचे रुंदीकरण व तीन जंक्शन चे काम प्राधिकरणामार्फत पूर्ण करण्यात आलेले आहे.
- वाघोली ते बकोरी, आय.व्ही. वाय. इस्टेट या रस्त्यांची कामे पूर्ण झालेली आहेत.
- वाघोली येथे अग्निशमन केंद्र कार्यालय इमारत, २८ कर्मचारी व २ अधिकारी निवासासाठी इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे वेरावली (ता.अंधेरी, मुंबई) येथील मोकळया भूखंडावरील अतिक्रमणाबाबत

(४२) ४२३९२ (२५-०४-२०२२). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जोगेश्वरी-विक्रोळी जोड रस्त्यालगत महाकाली गुंफेजवळील न.भू.क्र.१ मौजे, वेरावली, ता.अंधेरी, मुंबई या मोकळया भूखंडावर अतिक्रमण करण्याच्या उद्देशाने काही समाजविघातक व्यक्तींकडून अवैधरित्या मातीचे डेब्रिज आणून टाकण्यात येत असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू भूखंडावर मातीचे ढिगारे टाकणाऱ्या संबंधित समाजविघातक व गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींकडून परिसरात दहशत निर्माण करण्यात येत असून यामुळे स्थानिक नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला असून त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त भूखंडावर टाकण्यात येणारे मातीचे ढिगारे कोठून आणले जातात, सदरहू काम कोणत्या यंत्रणेमार्फत करण्यात येते, मातीचे ढिगारे कोणत्या वाहनांमधून आणले जातात या सर्वांची सखोल चौकशी व तपासणी करून सदरहू वाहने जप्त करून स्थानिक नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या संबंधित समाजविघातक व गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-०९-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) सदर ठिकाणी समाजविघातक व गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींकडून परिसरात दहशत निर्माण करुन तेथील नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला अशी कोणतीही बाब निदर्शनास आली नाही, असे गृह विभागाने कळविले आहे.

(३) हे खरे आहे, असे महसूल विभागाने कळविले आहे.

(४) सदर भूखंडावर विनापरवाना मातीचा भराव टाकून अतिक्रमण होत असल्याचे उघडकीस आल्याने, सदर भराव टाकणाऱ्या वाहनचालकांविरुध्द एमआयडीसी पोलीस ठाण्यामार्फत गुन्हा नोंद क्र. १२३४, १२३५, १२३६/२०२१ महाराष्ट्र पो. अधि. कलम ११५/११७ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे, असे गृह विभागाने कळविले आहे.

तसेच, अनधिकृतपणे डेब्रीज डंपिंग करणाऱ्यावर रु.२० हजार इतकी दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

दक्षिण नागपुरातील जुने नंदनवन येथील त्रिशताब्दी बगीचाची देखभाल दुरुस्ती करण्याबाबत

(४३) ४३००८ (१९-०४-२०२२). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण नागपुरातील जुने नंदनवन येथील त्रिशताब्दी बगीचाची देखभाल दुरुस्ती नागपूर महानगर पालिकेकडून घेण्यात आलेल्या खासगी कंत्राटदारकडून करण्यात येत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बगीचाच्या देखभाल दुरुस्ती करिता महानगरपालिकेकडून खासगी कंत्राटदाराला प्रतिमहा ३ लक्ष रुपये इतका निधी उपलब्ध करून दिला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू बाब स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महानगरपालिका आयुक्त व उद्यान अधीक्षक यांना दिनांक ७ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहाराद्वारे निदर्शनास आणली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१६-०९-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) पत्र प्राप्त झाले, हे खरे आहे.
(४) या तक्रारीच्या अनुषंगाने या उद्यानाची देखभाल करणाऱ्या कंत्राटदार यांना नागपूर महानगरपालिकेचे कार्यालयीन पत्र दि.१४.१२.२०२१ अन्वये उद्यानातील हिरवळीच्या देखभालीच्या कामात असलेल्या त्रुट्याची पुर्तता करण्याबाबत सूचित केले. त्यानुषंगाने उद्यानातील हिरवळीच्या कामात असलेल्या त्रुट्याची पुर्तता करुन उद्यानाची देखभाल व्यवस्थितरित्या करण्यात येत असल्याचे दि.०९.०३.२०२२ च्या पत्रान्वये कळविलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

कोरोना काळात विलगीकरणासाठी खोल्या उपलब्ध करून देणाऱ्या हॉटेल चालकांना मालमत्ता करातून सूट देण्याचा निर्णय रद्द करण्याबाबत

(४४) ४३१६९ (२६-०४-२०२२). अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) कोरोनाचा संसर्ग वाढलेला असतानाच्या कालावधीत विलगीकरणासाठी वापरण्यात आलेल्या २४१ हॉटेल चालकांना चार महिन्यांसाठी मालमत्ता करात ४१ कोटी ८७ लाख रुपयांची सूट मुंबई महानगरपालिकेकडून देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे होणारे आर्थिक नुकसान भरून काढण्यासाठी आरोग्य विभागाच्या आकस्मिक निधीमधून सदर रक्कम मालमत्ता कर संकलन विभागात वळविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, परदेशांमधून आलेल्या प्रवाशांच्या विलगीकरणासाठी पालिकेने या हॉटेल्सच्या खोल्या उपलब्ध करून दिल्यामुळे एक प्रकारे त्यांच्या व्यवसायाला कोरोना काळात हातभारच लावलेला असताना तसेच प्रवाशांनी त्या हॉटेलवाल्यांचे भाडे भरलेले असताना पुन्हा त्यांना कृतज्ञता व माणुसकी या नात्याने मालमत्ता करातून अशा प्रकारे सूट देणे योग्य नाही, अशा प्रकारच्या तक्रारी पालिका प्रशासनाकडे प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, छोटे दुकानदार, व्यापारी, कारागीर यांना कोणतीही सूट न देता बड्या व्यावसायिकांची काळजी घेणाऱ्या पालिका प्रशासनाच्या या निर्णयाच्या संदर्भात आलेल्या तक्रारींची चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व सदर निर्णय रद्द करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही करण्यात येत आहे ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-०९-२०२२) : (१) कोविड-१९ च्या दुसऱ्या लाटेमध्ये कोविड-१९ चा संसर्ग पसरु नये म्हणून परदेशात येणाऱ्या प्रवाशांच्या अलगीकरणाकरिता काही हॉटेल्स माहे फेब्रुवारी, २०२१ ते मे, २०२१ या कालावधीत अधिग्रहीत करण्यात आली होती. एकूण २३४ हॉटेल व्यावसायिकांना माहे फेब्रुवारी, २०२१ ते मे, २०२१ या चार महिन्यांकरिता मालमत्ता करात रु. ४१.८७ कोटीची सूट महापालिकेच्या दिनांक ३०.१२.२०२१ रोजीच्या ठरावान्वये मंजूर करण्यात आली आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) हे खरे आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) हे खरे नाही. याबाबतच्या कोणत्याही तक्रारी अद्यापपर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या नाहीत.

संपूर्ण देशात कोरोना विषाणूचा दुसऱ्या लाटेचा प्रादुर्भाव सुरु असतांना प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून मुंबईमध्ये दिनांक १ फेब्रुवारी, २०२१ ते ३१ मे, २०२१ पर्यंत कोविड-१९ च्या दुसऱ्या लाटेतील अलगीकरण व विलगीकरणाकरिता मुंबईतील काही हॉटेल्स बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून अधिग्रहीत करण्यात आली होती. याकरिता महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या दरामध्ये हॉटेल व्यावसायिकांनी आंतरराष्ट्रीय प्रवासादरम्यान विमानतळावर करण्यात आलेल्या संस्थात्मक अलगीकरणासाठी कोविड-१९ रुग्णांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विलगीकरण कक्ष स्थापनेसाठी हॉटेल्स उपलब्ध करुन दिली.

कोविड-१९ प्रादुर्भावाची साथ अतिउच्च टप्प्यात असतांना हॉटेल व्यावसायिक यांच्या सहभागामुळे अलगीकरण/विलगीकरण सुविधा नागरिकांना पुरविण्यात आली व त्यामुळे कोविड-१९ वर नियंत्रण ठेवणे महानगरपालिकेला शक्य झाले आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करता, अधिग्रहीत केलेल्या हॉटेल्सच्या चार महिन्यांच्या कालावधीतील मालमत्ता कराची रक्कम महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील अर्थसंकल्पीय तरतुदीतून वळती करण्याबाबत "वेलनेस पॅकेज" जाहिर करण्यात आले आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

मौजा सिरसोली ते निंर्भाणी (ता.आष्टी, जि.वर्धा) येथील नदीवरील पुलाच्या बांधकामाबाबत

(४५) ४३६३९ (१८-०४-२०२२). श्री.दादाराव केचे (आर्वी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी (जि.वर्धा) तालुक्यातील मौजा सिरसोली व मौजा निंर्भाणी, ता.तीवसा (जि.अमरावती) या दोन्ही गावाच्या मध्यभागी वर्धा नदी वाहत असल्यामुळे व मौजा सिरसोली येथील शेतकऱ्यांची शेती नदी पलिकडे असल्यामुळे शेतकऱ्यांना शेती करण्याकरिता १५ ते २० कि.मी. वळसा घेऊन जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजा सिरसोली येथील शेतकऱ्यांना शेती करण्याकरिता निंर्भाणी येथील वर्धा नदीवरील पुल बांधण्यासाठी कार्यवाही करून निधी उपलब्ध करून देण्यासाठी अनेक संघटनांनी आंदोलने करून मागणी केली आहे, हे खरे आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. रविंद्र चव्हाण (१९-०९-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) पुलाचे काम हे निकष, मंजूरी व निधी उपलब्धततेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

वसई-विरार शहर (जि.पालघर) महानगरपालिकेतील
प्रकल्पग्रस्तांची रिक्त पदे भरण्याबाबत

(४६) ४३८४४ (०१-०४-२०२२). श्री.विनोद निकोले (डहाणू) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहर (जि.पालघर) महानगरपालिकेत प्रकल्पग्रस्तांची वर्ग-३ व वर्ग-४ ची अनेक पदे मागील वर्षापासून भरण्यात आली नसल्यामुळे व प्रकल्पग्रस्तांची उपासमारी होत असल्याने रिक्त पदे भरण्याची विनंती प्रकल्पग्रस्तांनी निवेदनाद्वारे केली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई-विरार शहर महानगरपालिका स्थापनेपासून प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्तांसाठी ५ टक्के पदे राखीव असतानाही कोणतीही पदे अद्याप न भरण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, प्रकल्पग्रस्तांची वर्ग-३ व वर्ग-४ ची राखीव पदे तात्काळ जाहिरात काढून भरण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-०९-२०२२) : (१) वसई विरार शहर महानगरपालिकेस अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे निदर्शनास येते.
(२), (३) व (४) वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील प्रकल्पग्रस्त व भुंकपग्रस्तासाठीची पदे समांतर आरक्षणाद्वारे भरावयाची आहेत. तथापि, महानगरपालिकेने सरळसेवेने वर्ग-३ व वर्ग-४ ची पदे भरण्याकरीता महापरीक्षा पोर्टल यांचेशी पत्र व्यवहार केला असल्याचे वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

तसेच दिनांक ०३.०१.२०२२ रोजी पालघर जिल्ह्यासाठी नविन बिंदुनामावली जाहीर केली आहे. त्यानुसार नव्याने बिंदुनामावली मागासवर्गीय कक्ष, कोकण विभाग यांचेकडून तपासून घेऊन प्रकल्पग्रस्त / भुंकपग्रस्त यांचा अनुशेष सरळसेवेने भरण्यात येणार असल्याचे वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

नायगाव (जि.नांदेड) शहरातील नांदेड-नरसी-देगलुर प्रमुख राज्यमार्ग क्र.६ या महामार्गाच्या निधीसाठी तरतूद करण्याबाबत

(४७) ४३९४८ (३०-०३-२०२२). श्री.राजेश पवार (नायगांव) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नायगाव (जि.नांदेड) शहर नांदेड-नरसी-देगलुर प्रमुख राज्यमार्ग क्र.६ व नव्याने घोषित राष्ट्रीय महामार्ग १६१ या मुख्य महामार्गावर दोन्ही बाजूला समान वसलेले असून, त्यामुळे रस्ता ओलांडताना मोठ्या प्रमाणावर दरवर्षी अपघात होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नायगाव हे तालुक्याचे व बाजारपेठेचे ठिकाण असुन मोठ्या प्रमाणावर बाजाराच्या दिवशी महामार्गावर वाहतूक कोंडी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नायगाव तालुक्यात सामान्य नागरिक, विद्यार्थी व व्यावसायिकांची दोन्ही भागांना जोडणारा उड्डाणपुल बांधण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त महामार्गाच्या निधीसाठी शासनाने कोणती तरतूद केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (१६-०९-२०२२) : (१) अपघाताची नोंद आहे. अपघात टाळण्यासाठी सद्यस्थितीत रस्त्याच्या शहरातील लांबीमध्ये दुभाजक बसविण्यात आले असून, वाहनांची गती मर्यादित ठेवण्यासाठी गतीरोधक तसेच सुचना फलक बसविण्यात आले आहेत.
(२) होय. हे खरे आहे.
(३) होय. हे खरे आहे.
(४) वळण रस्त्याचे काम निकष, मंजुरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

कोपरगाव (जि.अहमदनगर) येथे जंगली श्वापदांपासून शेतीचे नुकसान होत असल्याबाबत

(४८) ४४४१९ (१८-०४-२०२२). श्री.आशुतोष काळे (कोपरगाव) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोपरगाव (जि.अहमदनगर) येथे रानडुक्कर, काळवीट आदि जंगली श्वापदांचा वावर ग्रामीण भागात वाढला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्वापदांकडून रात्रीच्या वेळी शेतातील उभ्या पिकांची मोठ्या प्रमाणात नासाडी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जंगली श्वापदांचा बंदोबस्त करण्यासाठी वन विभागामार्फत कोणती कार्यवाही केली वा येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०८-२०२२) : (१) व (२) हे खरे आहे.

(३) वन्यप्राण्यांचा शेती व लोकवस्तीजवळील वावर कमी करण्यासाठी तसेच मानव-वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या दृष्टीने क्षेत्रीय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

- वनक्षेत्रात तसेच वनक्षेत्राजवळच्या भागामध्ये वन कर्मचाऱ्यांमार्फत दिवस-रात्र गस्त घालण्यात येते.
- मानव-वन्यप्राणी संघर्ष कमी करण्याच्या दृष्टीने स्थानिकांमध्ये जनजागृती करण्यात येते.
- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पिण्याचे पाणी तसेच भक्ष्य उपलब्ध व्हावे याकरीता उपाययोजना करण्यात येतात.
- क्षेत्रीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना मानव-वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण देण्यात आले असून त्यांना ट्रॅप कॅमेरा, पिंजरे इत्यादी साहित्य उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

उपवळे ते शिराळा (ता. शिराळा, जि.सांगली) येथील मोरणा नदीवर पुल बांधण्याबाबत

(४९) ४४४७३ (१०-०४-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे उपवळे - कदमवाडी (ता.शिराळा, जि.सांगली) येथील उपवळे ते शिराळा ग्रामीण मार्ग ३१ या रस्त्यावर मोरणा नदीवर पुल बांधण्यात यावा, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थांनी अनेकवेळा शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे जुन-जुलै, २०२१ च्या दरम्यान अतिवृष्टीमुळे नदीपात्राबाजूचा रस्ता पुर्ण वाहून जाऊन तडवळे, उपवळे-कदमवाडी (प) या गावांचा बत्तीस शिराळापासूनचा संपर्क तुटला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नाबार्ड अर्थसहाय्य योजनेअंतर्गत सदर पुल बांधता येईल असा अभिप्राय ग्रामविकास विभाग यांनी दिनांक २४ फेब्रुवारी, २०२१ च्या पत्रान्वये दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नाबार्ड अर्थसहाय्य योजनेतून सदर पुल बांधण्यासाठी कार्यवाही करण्यात आली आहे काय असल्यास कार्यवाहीचा तपशील काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१२-०९-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) विषयांकित पुलाचे काम हे निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

हिंगोली जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१ बायपास येथील उड्डाणपुल बासंबा फाटा येथे करण्याच्या प्रस्तावाबाबत

(५०) ४५४१९ (२०-०९-२०२२). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र.१६१ बायपास येथील बासंबा फाटा येथे उड्डाणपुल करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उड्डाणपुलाच्या कामास विलंब होत असल्याने अपघाताच्या संख्येत वाढ होत आहे त्यामुळे स्थानिक नागरिकांनी रास्तारोको आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार सदर उड्डाण पुलाच्या कामास तात्काळ सुरुवात करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (११-१०-२०२२) : (१) हे खरे नाही.

वाशिम ते पांगरे ता.जि.हिंगोली पर्यंतच्या राष्ट्रीय महामार्ग क्र.१६१ चे चौपदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या अखत्यारीत असून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत करण्यात आले आहे.

बासंबा फाटा येथे चौपदरीकरण तसेच टी जंक्शनचे बांधकाम करारनाम्यानुसार तसेच IRC मानकानुसार करण्यात आले असुन सदर रस्ता वाहतुकीसाठी सुरु करण्यात आला आहे.
(२) स्थानिक नागरिकांनी दि.२६.०४.२०२२ रोजी उड्डाणपुलाच्या मागणीसाठी रास्तारोको आंदोलन केले होते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन : **राजेन्द्र भागवत**
नागपूर. **प्रधान सचिव,**
महाराष्ट्र विधानसभा

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.